# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. ०२/०२/२०१०

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक ०२/०२/२०१० रोजी सभा सुचना क्र. १९ दि. २८/०१/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. दिनेश नलावडे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. दिनेश दगडू नलावडे | -- | सभापती |
| २) | श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो | -- | सदस्या |
| ३) | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | -- | सदस्या |
| ४) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | -- | सदस्य |
| ५) | श्री. अनिल दिवाकर सावंत | -- | सदस्य |
| ६) | श्री. जुबेर इनामदार | -- | सदस्य |
| ७) | श्री. मदन उदितनारायण सिंह | -- | सदस्य |
| ८) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| ९) | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | -- | सदस्य |
| १०) | श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी | -- | सदस्य |
| ११) | श्री. चंद्रकांत म्हात्रे | -- | सदस्य |
| १२) | सौ. सुधा व्यास | -- | सदस्या |
| १३) | सौ. वर्षा भानुशाली | -- | सदस्या |

**गैरहजर सदस्य –**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. बर्नट अल्बर्ट डिमेलो | -- | सदस्य |
| २) | सौ. अनिता ज. पाटील | -- | सदस्या |

**मा. सभापती :-**

नमस्कार, स्थायी समितीचे सर्व सदस्य, मा. आयुक्त साहेब, उपायुक्त साहेब, सचिव साहेब, तसेच महानगरपालिकेचे सर्व अधिकारी या सर्वांच स्वागत करून. आजच्या सभेला सुरूवात करून. आजच्या सभेला सुरूवात करावी अशी मी सचिव साहेबांना विनंती करतो.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. ०२/०२/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १९, दि. २८/०१/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, प्रकरण क्र. १२६ हा विड्रॉ करतो.

**अनिल सावंत :-**

विड्रॉ केला बरोबर आहे. पण विड्रॉ करायच्या अगोदर तुम्ही गोषवारा दिला. सर्व स्थानिक वृत्तपत्रांमध्ये महानगरपालिकेची या शहराची ऐवढी नाचक्की झालेली आहे. तर हा प्रस्ताव देण्यापूर्वी ...

**मा. आयुक्त :-**

विड्रॉ केल्यानंतर चर्चा नसते.

**प्रविण पाटील :-**

साहेब पेपरमध्ये बातमी आल्यानंतर तुम्ही विड्रॉ करता.

**मा. आयुक्त :-**

विषय विड्रॉ झाल्यानंतर त्यावर चर्चा होत नाही.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, विड्रॉ करनेसे पहले में एक सुचना करता हुं। हर्षद भाई पी जोशी जो चौक है तो हमने पुराना लेटर दिया है।

**मा. आयुक्त :-**

वह विषय विड्रॉ हुआ तो अब उसपर चर्चा नही होती है।

**शरद पाटील :-**

साहेब, आम्ही त्या विषयावर डिसकशन करत नाही. पण, आम्हाला हे बोलायच आहे की, कुठचा ही विषय येत असताना या शहरासाठी, शहरातील लोकप्रतिनिधी असु द्या व अधिकारी असु द्या. ह्यांच्यावर कुठचीही शिंतोडे उडतील असे विषय आपण आणु नये. आणि असेल तर त्याची आपण चौकशी करूनच आणावे.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, यापूर्वी मी, सर्व प्रशासनाला कल्पना दिली होती. कोणतही नाव देण्यापूर्वी दहा वेळा विचार करा. आणि नाव देताना त्यामध्ये शिफारसीचा संबंध येत नाही. कारण, बॉडी आहे. बॉडीनेच निर्णय घ्यायचा आहे. त्यामध्ये आपल्याला, प्रशासनाला अधिकार नाही. नाव ठेवण्याचा अधिकार स्थायी समिती आणि मा. महासभेला आहे. आपण शिफारस करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. त्यामुळे नाव ठेवणे हा विषय पूर्णपणे स्थायी समिती आणि मा. महासभेमध्ये निगडीत आहे.

**प्रविण पाटील :-**

शिफारस करत नाही. तर मग, आपण इथे शिफारस करण्याच नाव कस देतो?

**शरद पाटील :-**

लोक प्रतिनिधींना शिफारस करायची. त्यांनी पत्र दिलेले आहे. विषय तो नाही.

**मा. आयुक्त :-**

त्यांनी लोकप्रतिनिधींनी शिफारस केले म्हणून तुम्हाला दाखवल. आम्ही आमचा त्यामध्ये निर्णय दिलेला नाही.

**प्रविण पाटील :-**

साहेब, आपण ह्याच्यात शिफारस करणा-याला महत्व देत नाही. मग, आपण नावाचा कसा उल्लेख करतो. शिफारस देणा-याच नाव.

**अनिल सावंत :-**

लोक प्रतिनिधीने ही शिफारस कुठे केली?

**प्रविण पाटील :-**

लोकप्रतिनिधी शिफारस पण त्याच्यामध्ये नाही.

**मा. आयुक्त :-**

या विषयावर आम्ही अस म्हंटलेल आहे की, ज्यांनी ज्यांनी प्रस्ताव दिली नमुद केल. त्यांनी शिफारस केलेले ते बघा. हा विषय आम्ही विड्रॉ केलेला आहे.

**प्रविण पाटील :-**

विड्रॉ करता मान्य केल. पण कशाला विड्रॉ करता. त्याच कारण काय?

**मा. आयुक्त :-**

प्रशासनाने निट तपासून माझ्यासमोर सादर करा असे सांगितलेल आहे.

**प्रविण पाटील :-**

साहेब, तस नाही होत. प्रशासनाने नाही जेव्हा या शहरामध्ये वातावरण तंग झाले. ज्या पेपरमध्ये बातमी आल्या. आपण त्याची अजिबात कोणीही व्यवस्था केली नाही. कोणीही कोणाच नाव देते. हर्षद जोशी देतो. जुबेर पटेल असो कोणीही असो. तुम्ही त्याची माहिती नाही करत. मा. सभापती साहेबांची सही केली. त्यानंतर तुमची सही आहे. त्यानंतर हा विषय आलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

मी पाहिल्यानंतरच स्वतः सांगितल की, हा विषय विड्रा करण्यात येत आहे. विषय आणायच्या अगोदर तुम्ही हा विषय बघायचा होता तरच विषय आणायचा होता.

**मा. आयुक्त :-**

त्यासाठी मी विड्रॉ केल.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, मी आापल्याला एक पत्र दिलेल आहे. बी.पीएम.सी. ॲक्ट १९४९ मधील २ (१) (क) अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. तर सगळे विषय संपल्यानंतर शेवटी हा विषय घ्यावा.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. आपण शेवटी विषय घेवू.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११८, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम ७ नुसार मालमत्ता कराचे आकारणीसाठी करयोग्य मुल्य ठरविण्यासाठी भाडेमुल्याचे वाजवी दरास मंजूरी मिळणेबाबत.

**याकुब कुरेशी :-**

आता आपण दर वाढीच्या हिशाबाने सांगायला गेलो. तर अनधिकृत बांधकामांना ३ पट वाढवून घेतो. तर त्याचा आपल्याकडे आराखडा आहे का? आपली कर वसुली किती होवू शकते?

**मा. आयुक्त :-**

४३ लाख ८७ हजार ७८ रू.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहब अब यह जो भाडे वाढीव और कर वाढीव का विषय लाये है। पिछले बार जब ३ साल का लेखा परिक्षण का अहवाल दिया था। लेखा परिक्षक ने जो आक्षेप लिया था। उन सब पे कुछ कारवाई हुई क्या? अबतक क्या कारवाई हुई?

**मा. आयुक्त :-**

सब्जेक्ट यह पुकारा ना.

**मदन उदितनारायण सिंह :-**

सब्जेक्ट क्यो पुकारा?

**मा. आयुक्त :-**

यह सब्जेक्ट शुरू हुआ ना!

**मदन उदितनारायण सिंह :-**

मै उसी सब्जेक्ट को लेकर बोल रहा हुँ।

**दादासाहेब पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. आपण जो ३ वर्षांचा लेखा परिक्षण अहवाल दिलेला आहे. तर ह्या अहवालापर्यंन्त आम्ही मार्च एण्ड पूर्ण कारवाई करत आहोत.

**मदन उदितनारायण सिंह :-**

अजूनपर्यंन्त झालेली नाही.

**दादासाहेब पाटील :-**

चालू आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आत्ता पर्यंन्त काय कारवाई झालेली आहे?

**दादासाहेब पाटील :-**

तुम्हाला मार्च एण्ड चा जो रिपोर्ट आहे तो आम्ही देवू.

**मदन उदितनारायण सिंह :-**

लेखा परिक्षण दिल्यावर त्यात किती दिवसाची कारवाई करण्याची अवधी आहे का? सिमा आहे का?

**दादासाहेब पाटील :-**

त्याच्यात अस काय म्हंटलेल नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

९० दिवसाची बांधिलकी आहे का?

**दादासाहेब पाटील :-**

नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आहे. ९० दिवसाच्या आत त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे.

**दादासाहेब पाटील :-**

त्याच्यामध्ये जे आहे. त्या वसुली असतील किंवा जे काही आक्षेप गंभीर असतील, त्याच्यात काही सुधारणा असतील त्या सर्व आम्ही मार्च एण्ड पर्यंत करून घेतो.

**मदन उदितनारायण सिंह :-**

अजून मार्चची का वाट बघता? मागे जेव्हा तुम्ही आणल होतं तेव्हाच आम्ही फेटाळून लावल होत की ह्याच्यावर आक्षेपवर कारवाई करून परत आणावी.

**दादासाहेब पाटील :-**

आक्षेपावर कारवाई करायच काम जे आहे ते त्या-त्या विभागाच काम आहे. त्या-त्या विभागाचे जे सगळे कर्मचारी होते ते सगळे इलेक्शन ला गेले. त्या मधले बरेचसे प्रॉपर्टी टॅक्स च्या कामाला गेले होते. आणि ही कारवाई चालू होती त्यामुळे आमच्याकडे लोक नव्हती. म्हणुन ते राहिलेले आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आपने जो बोला यह विषय नही है। यह विषय ऐसा है की, अगर जो आक्षेप इन्होने लिया है। उस आक्षेप पे कारवाई हो और वह सब काम सही ढंग से चले तो अपने को दरवाढी की जरूरत नही पडेगी। इसके लिए इस विषयसे संबंधित है।

**मा. आयुक्त :-**

यह गलत है। ऑडीट याने की ॲडमिनिस्टेशन और लोकप्रतिनिधी इनको गाईड लाईन्स है। यानी की उसमेसे बहुत बडा अमाऊंट निकलने वाला है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

वसुली का आक्षेप है।

**मा. आयुक्त :-**

वसुली का आक्षेप है यानी की क्या है?

**मदन उदितनारायण सिंह :-**

फायर ब्रिगेड का आक्षेप है। की, इनका फायर का आकारणी होता है। जो मिनीमन होता है वह नही होता है। अतिक्रमण पे जो दंड है वसुली है वह नही होती है।

**मा. आयुक्त :-**

वह कितना होगा?

**मदन उदितनारायण सिंह :-**

क्यो नही होगी? अपने यहा अतिक्रमण की कितनी वसुली होती है।

**शरद पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आता ऑडीटर साहेबांनी सांगितल की, आमच्याकडे माणस नव्हती. माणस नव्हती म्हणजे किती वेळ माणस नव्हती.

**मा. आयुक्त :-**

लोकसभा निवडणूक, आणि विधानसभा निवडणूक संपल्यानंतर सुध्दा. मतमोजणी झाल्यानंतर सुध्दा एक-एक महिना भर माणस आली नव्हती.

**शरद पाटील :-**

लेखा परिक्षणेमध्ये ३ वर्षाचा तुमच्यावर ठपका ठेवलेला असताना.

**मा. आयुक्त :-**

ठपका ठेवलेला नाही. जे ऑडीट होत त्या ऑडीटमध्ये काही त्रुट्या प्रत्येकाच्या निघतात. प्रत्येक महापालिकेमध्ये, गर्व्हरमेन्टचे सगळे निघतात. त्याच्यात दुरूस्ती काय करायची, काय चुकीच झाले, काय बरोबर झाले ही तपासणी असते. तपासणीमध्ये गाईड लाईन देतात. की, कशी कागद पत्राची पुर्तता करायची असते, काही राहिलेल असत. त्याच उत्तर द्यायच असते, उत्तर समाधान कारक पटल नाही तर रिकव्हरी असते.

**शरद पाटील :-**

मग, त्या तपासणीमध्ये काय सापडल काय नाही सापडल ते आम्हाला सांगाव ना. ऑडीटर साहेबांनी त्याच क्लेरिफिकेशन द्याव ना.

**मा. आयुक्त :-**

त्यासाठीच तुमच्या समोर ठेवल होत ना.

**शरद पाटील :-**

आमच्या पुढे ठेवल असत ना. मी तुम्हाला खात्री ने सांगतो. या शहरातील १०० टक्के सदनिकांना करण्यात टॅक्स आकारणी झालेली आहे का?

**मा. आयुक्त :-**

या वर्षी मी आल्यानंतर साडे तीन कोटी चे असेसमेंन्ट केलेल आहे. माझ्याकडे पूर्वी ५९ कोटी डिमान्ड होता. तो ७७ कोटी वर गेलेला आहे. आणि साडे आठ कोटी ची आकारणी मी या वर्षी केलेली आहे.

**शरद पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, तुमच्या क्षमते बद्दल आम्हाला कुठेही शंका नाही. मी तुम्हाला एवढाच प्रश्न विचारला १०० टक्के सदनिकांना आकारणी झालेली आहे का? नसेल तर मी तुम्हाला कितीतरी बिल्डींग दाखवतो की, त्याला आकारणी झालेली नाही.

**मा. आयुक्त :-**

सगळ्या प्रभाग अधिका-याकडून सर्टीफिकेट घ्या. माझ्या हद्दीत कर आकारणीची एक ही बिल्डींग शिल्लक नाही. ८ दिवसाच्या आत हे झाल पाहिजे. प्रत्येक क्लार्क आणि प्रत्येक प्रभाग अधिकारी साडे आठ कोटी रू. ची यावर्षी आकारणी केलेली आहे. राहिली असतील तर परत तपासणी करून आकारणी केली जाईल.

**शरद पाटील :-**

मला एवढच बोलायच आहे. आपण लोकांवर हा बोजा वाढवण्यापेक्षा जर ती आकारणी केली तर आपण जे वाढीव पैसे लावलेले आहे त्याच्यापेक्षा जास्त पैसे देतील. माझा दावा आहे.

**मा. आयुक्त :-**

याचा अर्थ असा की, हे दाखवून ते थांबवा. अस नसत. मा. सभापती साहेब, २००१-२००२ मध्ये ७०० ते ८०० रू. फ्लॅट चा रेट होता. आणि आता २००९-१० मध्ये कमीत कमी अडिच हजार ते ४ हजार रेट झालेला आहे. आणि महापालिकेने कर आकारणीचे जे दर होते. ते १९९८ साली फिक्स केलेले आहेत. गर्व्हमेंट ने जे अगोदर डायरेक्शन दिल होत. लॅण्ड वर ६ टक्के आणि कन्स्ट्रक्शन वर ८ टक्के अशाने जर केल असत तर आता जे आम्ही दर सुचवले त्याचा १० पट्टीने दर झाल असत म्हणजे लॅण्ड कॉस्ट ६ टक्के जमिनीच्या किंमतीवर ६ टक्के कन्स्ट्रक्शन कॉस्ट जे ४ हजार रेट आहे त्यावर ८ टक्के हे दोन्ही मिळून एकत्र रेटेबल व्हॅल्यू झाल त्यावर आकारणी होते. आता आम्ही रेन्टल बेसिस काढण्यासाठी १ रू. ५० पैसे ९८ ला रेट फिक्स केला. ९८ ला ज्या वस्तू मिळत होत्या त्या वस्तु आता सगळ्यांना महापालिकेच सोडून बाकीच्यांना दहा वर्ष मध्ये २००८ ला दहा वर्ष कम्प्लीट झाली. आता १२ वर्ष सुरू झाल. आणि दर वाढवायच नाही म्हणजे काय? महापालिका आता २ पैसे लिटर पाणी देत ते ही घरामध्ये. आणि आपण १२ रू लिटर ने बाहेर गेल्यानंतर १ लिटर पाणी घेतो.

**मदन उदितनारायण सिंह :-**

७ रू दर हजार आहे.

**मा. आयुक्त :-**

दर हजार म्हणजे त्याला १ हजाराला ७०० ने भागा ना.

**मदन उदितनारायण सिंह :-**

७ पैसे होतात.

**मा. आयुक्त :-**

७ पैसे कसे होतील पॉइन्ट ७ पैसे म्हणजे अर्धा पैसा पण नाही. १९९८ ला हे कर आकारणीचे दर दिले. १९९८ पासुन आतापर्यंत दर चेंज नाही झाले. ७०० चा भाव असले तरी लोक ४ हजाराने, ३.५० हजाराने ३ हजाराने खरेदी करायला लागले. आपलच स्वस्त करायच बाकीच्यांच महाग झाल तरी चालते.

**प्रविण पाटील :-**

साहेब, तस नाही. मिरा भाईंदर मध्ये फक्त बिल्डींग एरिया येत नाही. गावठण आहे, झोपडपट्ट्या आहे. तर तिथे आपण सुविधा देतो का?

**मा. आयुक्त :-**

गावठणाला सर्वांत जास्त सुविधा आहे. बाहेर बांधतात त्यांना कमी आहे. आपल्या लोकांना गटार रेडी आहे, रस्ता रेडी आहे बॉम्बे ला ज्या सुविधा आहेत त्या सुविधा इथे आहेत. महापालिकेने करायला पाहिजे म्हणजे काय करायच.

**प्रविण पाटील :-**

तुम्ही कुठल्या आधारावर कर वाढवता?

**मा. आयुक्त :-**

रस्ता साफसफाई होतात. स्ट्रीट लाईट होत, पाणी मिळत, खड्डा पडला की बुजवतो हे सगळ चालू आहे. बॉम्बे ला सुविधा मिळतात. बॉम्बे ला ९१ टक्के टॅक्स आहे. सगळी टोटल बेरिज केली तर ९१ टक्के टॅक्स आहे. आमचा टॅक्स हा फक्त ३८ टक्के आहे. आणि महापालिकेला जेएनएनयुआरएम खाली, अंडर ग्राऊण्ड ड्रेनेज. ३९२ कोटीचा आहे. पाणी पुरवठा योजना ११०० कोटी रू. च सबमिट केल.

**प्रविण पाटील :-**

ते आल्यावर समजेल. लोकांना कुठे समजलय की, आपल अजून ह्याच्यावर आहे. आल्यानंतर प्रत्यक्ष दिल्यानंतर ते द्या. साहेब तुमचा अजुन कचऱ्याचा प्रश्न बाकी आहे. नियमींत पाणी पुरवठा होत नाही. सगळे प्रश्न बाकी आहे. आणि तुम्ही आताच कर वाढीव केल तर लोक रस्त्यावर उतरतील. हा विषय आता आणु नका. तुम्ही सगळी सुविधा दिल्यानंतर हा विषय आणा. आपण जे बोलता ना एवढ्या सुविधा केलेल्या आहेत. तर त्या सुविधा प्रत्यक्ष आल्यात का?

**मा. आयुक्त :-**

पाणी पुरवठा योजना ११०० कोटीची आहे. स्टेट गर्व्हरमेन्ट ने मंजुरी दिले. एम.एम.आर.डी.ए. कडे, केंद्र शासनाकडे पाठवल.

**प्रविण पाटील :-**

आपण कर लोकांकडून घेतो. तर लोकांना काय फायदा होतो का?

**मा. आयुक्त :-**

नाही ना. अजिबात मिळत नाही. बॉम्बे वरून येतात ते प्रत्यक्ष फ्लॅट मध्ये जातात. आमच्या रस्त्यावरुन येत नाही.

**प्रविण पाटील :-**

साहेब, सगळेच काय फ्लॅट मध्ये राहत नाही.

**मा. आयुक्त :-**

आमच्या रस्त्यामध्ये येत नाही. जे गावठण मध्ये राहतात त्यांनाच सर्वांत जास्त सुविधा मिळतात.

**प्रविण पाटील :-**

साहेब, तस नाही. तुम्ही सांगता तसे नाही.

**मा. आयुक्त :-**

कर कमी, कर ३ पैसे ४ पैसे प्रॉपर्टी टॅक्स गावठण वाल्यांना आहे. जेएनएनयुआरएमची जी योजना सुरू झाली. त्या योजनेमध्ये सेंट्रल गर्व्हरमेन्टने ३५ टक्के स्टेट गर्व्हरमेन्ट १५ टक्के आणि महापालिकेने ५० टक्के घालायच. महापालिकेने ५० टक्के घालण्यासाठी यापूर्वी मिरा भाईदर महापालिकेने ३०० कोटी कर्ज काढलेले आहे. डी.पी.रस्त्यासाठी ८० कोटी, अंडर ग्राऊंड ड्रेनेज साठी २६ कोटी नंतर अंडर ग्राऊंड ड्रेनेज मंजुर झाल्यानतंर २०० कोटी, ३०० कोटी रू. चे कर्ज घेतल्यामुळे यापुढे ज्या योजना मंजूर होतील. ते एम.एम.आर.डी.ए कडून यापुढे तुम्हाला लोन मिळणार नाही अस सांगितलेले आहे. जर यापुढे लोन मिळणार नसेल. तर ह्या योजना एकही मंजूर होणार नाही. म्हणजे १९९९ ते २००० सालामध्ये ५० एमएलडी योजना मंजूर झाली. पूर्वी ३५ ची होती आता ८६ एम.एल.डी. आणि एम.आय.डी.सी. कडून ३५ एम.एल.डी. हे मिळून ९१ एम.एल.डी पाणी आता आपल्याला मिळत. जर, आपण पुढचा विचार केला नाही तर आता ही योजना यापूर्वीच पाठवायला पाहिजे होती.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, आजच्या तारखेला ९१ एम.एल.डी. पाणी मिळते का? मला माहिती पाहिजे.

**शिवाजी बारकुंड :-**

मिळते ना. एम.आय.डी.सी.ला मीटर आहे. तुम्ही जावून बघू शकता.

**मा. आयुक्त :-**

आता आपण ४० तासाने पाणी पुरवठा करतो.

**मदन उदितनारायण सिंह :-**

साहब, ७० से ८० घंटो से होता है। गुरूवार के बाद संडे को पाणी आता है।

**प्रविण पाटील :-**

साहेब, ते तुम्हाला वेगळी माहिती देतात. आणि तिथे वेगळी माहिती असते.

**मा. आयुक्त :-**

मी तुम्हांला सांगत होतो. आता बॉम्बे एरिया, ठाणे एरिया, कल्याण-डोंबिवली, मिरा-भाईंदर, भिवंडी यावेळी पावसाळा कमी झाला. पाऊस कमी झाल्यामुळे स्टॉक कमी आहे. आठवड्यातून एक दिवस जर शटडाऊन झाला तर आपल ६०-७० तासावर जात. हे मला माहित आहे. पण बोलायच्या अगोदर तुमचा विषय आहे. आम्ही रेग्युलर ४० तासाने पाणी देतो. परंतु आठवड्यातून एक दिवस बंद झाल्यानंतर तो ८० तासावर जातो. ते मला माहिती आहे. परंतु, यावर्षी परिस्थीती ती आहे. जर पाऊस जास्त आला असता तर ४० तासाने पाणी मिळाल असत. मी तुम्हाला यासाठी सांगतो की, एम.एम.आर.डी.ए. ने लोन देण्याच बंद केलेल आहे. आणि सेन्ट्रल गर्व्हरमेन्टकडे आपली पाणी पुरवठा योजना, घनकचरा, डी.पी. रोड, आणि नॅचरल नाले. यांचा प्रस्ताव जावून सेन्ट्रल गर्व्हरमेन्टकडे मंजूरीसाठी पडलेल आहे. जर ५० टक्के भरण्याची कुवत किंवा ५० टक्के लोन किंवा अनुदान देण्याची ताकद असेल. ते दाखवल्या नंतरच आपल्या योजना मंजुर होणार आहे. जर, आपल्याला वाटत असेल यासाठी मी तुम्हाला सांगितल की, ९८-९९ मध्ये ६००-७०० रू. दर फ्लॅटचा होता. आता ३५००-४००० वर झालेला आहे. तर महापालिकेचाच कर का वाढायचा नाही. त्यांच वाढत तर चालेल. आणि लोकसंख्या वाढीचा वेग, आशिया खंडातला एक नंबरचा आहे. २०० टक्के आहे. त्यामुळे लोकसंख्या वाढीचा विचार आणि इथली पुढची परिस्थिती जर विचारात घेतली नाही. आणि दर वाढवल नाही तर आपल्या योजना मंजूर होणार नाही. आणि निव्वळ दर वाढीसाठी या योजना, इतर महापालिका आणि इतर राज्य घेवून जातील. त्यामुळे आपल्या योजना मंजूर होणार नाही. आपण जे दर ९८ साली लावले ते ठेवायचे का वाढवायचे नाही. याचा विचार करून आपण निर्णय घ्या.

**प्रविण पाटील :-**

याच्यावर करवाढी हा एकच मार्ग आहे का?

**मा. आयुक्त :-**

या शिवाय दुसरा कुठलाही मार्ग नाही.

**प्रविण पाटील :-**

दुस-या कुठल्या वसुलीवर केल तर. आपला इतर परवाना आहे किंवा दुस-या वसुल्या आहेत. तिथे जर आपण व्यवस्थित अधिकारी कामाला लावले तर ही त्रुटी आपण भरून काढू शकतो.

**मा. आयुक्त :-**

साहेब, आपण भरून काढू शकणार नाही.

**प्रविण पाटील :-**

बरेच अशा वसुल्या आहेत. त्यामध्ये वसुल्या व्यवस्थित होतात.

**मा. आयुक्त :-**

१ एप्रिल पासुन ऑक्ट्रॉय बंद आहे. तिथे आपण या महापालिकेने भारतामध्ये अनुभव घेतलेला आहे. सेस लावुन ५० टक्के वसुली आहे. ५० कोटी रू. भरून कुठून काढणार? परवान्यामधुन ५० कोटी रू. भरून निघणार आहे.

**प्रविण पाटील :-**

हा एकच विषय नाही. अजून बरेच विषय आहे. तिथुन आपण उत्पन्न मिळु शकतो.

**मा. आयुक्त :-**

उत्पन्न मिळत. पण परवाना डिपार्टमेन्टचे जे दर आहे. ते इतर महापालिकेपेक्षा जास्त आहेत. जास्त असून देखील आम्ही वसुलीला स्वतंत्र माणसं नेमूण घरोघरी पाठवली या तीन महिन्यात आम्ही.......

**प्रविण पाटील :-**

साहेब, अजुन नोंदी नाही झाल्या. असे बरेचसे दुकान आहेत त्यांच्या नोंदी नाही झाल्या. कंपन्यांच्या नोंदी नाही झाल्या वसुली अजून बाकी आहे.

**मा. आयुक्त :-**

साहेब, तुम्ही माहिती न घेता बोलता. आपण तीन महिन्यामध्ये १ कोटी १० लाख रू. ची वसुली केली.

**प्रविण पाटील :-**

वसुली केली नोंदी केली का?

**मा. आयुक्त :-**

निव्वळ परवान्याची १ कोटी १० लाख रू. ची. वसुली केली. लोकांना परवाना दिलेला आहे?

**प्रविण पाटील :-**

मिरा भाईंदरमध्ये सर्व ठिकाणच्या नोंदी झालेल्या आहेत का?

**मा. आयुक्त :-**

आता पूर्व कंम्प्लीट होत आलेल आहे. भाईंदर पश्चिम .....

**प्रविण पाटील :-**

इंन्डस्ट्रीध्ये अजून नोंदी झालेल्या नाही.

**मा. आयुक्त :-**

साहेब १ कोटी १० लाख रू. ची रिकवरी झाली.

**प्रविण पाटील :-**

साहेब, रिकवरी झाली. नोंदी झाल्या माझ म्हणण अस आहे की, पूर्ण नोंदी नाही झाल्या.

**मदन उदितनारायण सिंह :-**

अजुन ७० टक्के बाकी आहे.

**मा. आयुक्त :-**

७० टक्के मार्च पर्यन्त कंम्प्लींट करणार आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आपण लोकांना परवाना दिलेलाच नाही. ७० टक्के ची नोंदणीच केली नाही.

**मा. आयुक्त :-**

आम्ही आता दहा माणस नेमूण दुकानावर जावून दुकानातच फॉर्म भरून दुकानातच लायसन्स द्यायच काम चालू आहे. तुम्ही समजून का घेत नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आपली १०० टक्के नोंदणी झाली आहे का?

**मा. आयुक्त :-**

१०० टक्के नोंदणी झाली नाही ना. पूर्वेच संपलेल आहे.

**प्रविण पाटील :-**

साहेब पुर्वेच बाकी आहे.

**मा. आयुक्त :-**

काही एरिया बाकी आहे. पण, किती वसुली केली ते बघा, किती लायसन्स घेतले ते तरी ऐकूण घ्या. मग बोला.

**प्रविण पाटील :-**

साहेब तुम्ही नोंदणी केली, वसुली केली त्याच्याबद्दल वाद नाही. तुम्ही १०० टक्के नोंदणी केली असेल, आणि वसुली ही केली असेल. पण १०० टक्के नोंदणी नाही केली.

**मा. आयुक्त :-**

पूर्वेची थोडीशी नोंदणी राहिली.

**प्रविण पाटील :-**

तिथे जोर मारा ना.

**मा. आयुक्त :-**

जोर मारून काय उपयोग होणार आहे. जोर तर मारण चालूच आहे. आम्ही बंद केलेले नाही. परंतु, तो करून करून किती करणार आहे.

**प्रविण पाटील :-**

साहेब, हा एक भाग झाला. फक्त नोंदणी परवाना.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त):-**

२००० आस्थापनाला आपण नोटीस पण दिलेल आहे.

**मा. आयुक्त :-**

आतापर्यंत किती लायसन्स दिले ते सांगा.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

४ हजार लायसन्स दिलेले आहे. आणि ७ हजार आस्थापनच्या रेकॉर्ड वर आणलेले आहे. आणि जवळ जवळ २००० लोकांना नोटीस पण दिलेल्या आहेत.

**प्रविण पाटील :-**

कितीतरी इंडन्स्ट्री आहेत तिथ आपले अधिकारी अजुन पर्यंन्त पोहचलेच नाही. तिथुन आपल्याला कितीतरी उत्पादन मिळू शकत.

**मा. आयुक्त :-**

किती लोकांना दिले आणि किती लोकांना द्यायच राहिल एवढ सांगा ना.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

आपण ४ हजार लोकांना लायसन्स दिलेल आहे. फक्त पूर्वेला.

**प्रविण पाटील :-**

सर्व्हे केला किती आहे? त्याच तरी आपल्याकडे नोंद आहे का?

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त):-**

साहेब, आहे ना !

**प्रविण पाटील :-**

१२ हजार आस्थापना आहेत. बरेच इंडस्ट्रीवाले आहेत. त्यांच्याकडे आपले अधिकारी आणि माणसे अजूनपर्यन्त पोहचले नाही.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त)** :-

साहेब, अधिकारी पोहचले आहेत. आपले फॉर्म त्यांना पोहचले आहेत.

**प्रविण पाटील :-**

आपण मागच्या वेळेला सांगितल की, तुमचे नियम शिथिल करून ते द्यायला तयार आहे.

**मा. आयुक्त :-**

साहेब, आम्ही सांगुन सोडून देत नाही. मी तुमच्यापुढे सांगितल्या नंतर आम्ही जवळजवळ ४ हजार लोकांना लायसन्स दिले. त्यांची फी वसुली केली १ कोटी १० लाख तीन महिन्यात.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

प्रत्येक आस्थापनेचा फॉर्म दिलेला आहे.

**मा. सभापती :-**

सर्वांच्याकडे न पोचण्यासाठी आपल्याला इकडे काय कमतरता अहे. कामगार कमी आहे. किंवा आपण तिकडे पोहचूच शकत नाही. किंवा आपल्याकडे वेळ कमी आहे. प्रॉब्लेम काय आहे? आपल्याकडे जी इनकम ज्या ठिकाणी आपल्याला मिळणार आहे. त्या परवानगी ........

**मा. आयुक्त :-**

जानेवारी, फेब्रुवारी, मार्च या महिन्यामध्ये पाणीपट्टी आणि घरपट्टी वसुली असते. नळ कनेक्शन तोडणे, पाणीपट्टी वसुली करणे, घरपट्टी वसुल करणे.

**प्रविण पाटील :-**

साहेब, परवाना हा एक भाग झाला. पाणीपट्टी, घरपट्टी कुठे १०० टक्के झाले?

**मा. आयुक्त :-**

१०० टक्के महाराष्ट्रामध्ये कुठेच होत नाही. आणि तुमच्या माहितीसाठी एक सांगतो. तुम्ही आतापर्यंत कोणाला तरी विचारून घ्या. मागच्या वेळेला मी ८४ टक्के वसुली केली. आणि १०० टक्के पाणीपट्टी, प्रॉपर्टी टॅक्स कुठेही कोणाचीच होत नाही. आणि इतर कुठल्याही महापालिकेने आमच्यापेक्षा जास्त करून दाखवून देणे. तुम्ही सांगाल ते मी ऐकतो.

**प्रविण पाटील :-**

साहेब, हा एक भाग झाला उत्पन्नाचा. तुम्ही सांगता कर्ज आहे, सगळ आहे. याचा अर्थ असा की, फक्त टॅक्स वाढवूनच होणार का?

**मा. आयुक्त :-**

साहेब, आपण आता घरात आहे. घरात आता ५० हजार रू. लोन दिलेल आहे. ते परत येणार तेव्हा विचारात घेवूनच योजना मंजूर होतात. म्हणजे प्रॉपर्टी टॅक्स जरी कमी वसुली म्हणत असाल तर सर्वात जास्त आमची आहे.

**प्रविण पाटील :-**

मान्य केल. पण का एकच मार्ग आहे का? आणि आजच्या तारखेला आणायची काय गरज होती. ह्या योजना आहेत त्या लागु होवू दे. लाखो लोकांना समजू द्या.

**मा. आयुक्त :-**

तस नाही ॲक्ट मध्ये प्रोव्हीजन आहे.

**सुधा व्यास :-**

मा. आयुक्त साहब, मेरा रिटर्न विरोध है वह आप लेलो।

**मा. आयुक्त :-**

दरवाढ करायच नसेल तर योजना पण नको त्या बरोबर. जेएनएनयुआरएम च्या योजना नको. असे पण नोंद करा.

**मा. सभापती :-**

आप बादमे बोलो. पहले चर्चा होने दो। अभी कोई भी विषय मंजुर हुआ भी नही। उसके पहले आपका विरोध अभी चर्चा चालू है।

**मा. आयुक्त :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम...

**सुधा व्यास :-**

सभी सदस्य बोल रहे है । इसलिए टाईम नही मिला।

**मा. आयुक्त :-**

अभी डिस्कशन चालू है। Resolution के वक्त आप मा. सभापती साहब ते बात करो और आपका जो निवेदन है वह भी सभापती साहब को दो।

**सुधा व्यास :-**

यह प्रशासन का है। या सभापती साहब का है। किसको हॅण्ड ओव्हर करना है?

**मा. आयुक्त :-**

मै नही। मै निर्णय देने के लिए बैठा हूॅं। महापालिकने याबाबतीत स्थायी समितीचे प्रस्ताव विचारात घेवून पुढील सरकारी वर्षात १५७ पोटकलम १ विनिर्दिष्ट केलेले कर ज्या दराने बसवण्यात येतील ते दर व उक्त कलमाच्या पोटकलम २ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या करापैकी जे कोणतेही कर बसवण्याचे ठरवले असेल ते कर पुढील सरकारी वर्षाच्या दराने व ज्या मर्योदेत बसवण्यात येतील ते दर व ती मर्यादा प्रकरण ११ मध्ये विहित केलेल्या मर्यादा व शर्तीस अधीन राहून फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेस व तत्पूर्वी निश्चित केले पाहिजे. फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेपूर्वी मा. महासभेने निर्णय केला पाहिजे. म्हणून हा विषय आणला. आणि गेली २००२ पासून आतापर्यन्त कोणतीही दर वाढलेल नाही. आणि योजना नको असतील तर आमच काही म्हणण राहणार नाही. आमच्यामुळे जे प्रस्ताव सेंन्ट्रल गर्व्हरमेन्टकडे पडलेल आहे. ते मंजूर झाल नाही अस नको व्हायला. कारण, एम.एम.आर.डी.ए. कर्ज द्यायच बंद होणार आणि ५० टक्के रक्कम कुठून प्रत्येक योजनेला घालायच ते तुम्ही ठरवा. मग, तुम्ही कर वाढ करायचा की नाही. हा तुम्ही निर्णय घ्यायचा आहे. ह्याच अस म्हंटलेल नाही. तुम्हाला तुमच्या पुढे ठेवलेल आहे. तुम्ही करायच की नाही हे निर्णय तुम्ही घ्या. जर करायच नसेल तर योजना पण नको म्हणा.

**प्रविण पाटील :-**

याच्यावरूनच योजना ठरणार का? नुसत करवाढी करून....

**मा. आयुक्त :-**

याशिवाय योजना होणार नाही.

**प्रविण पाटील :-**

तुम्ही त्याचा संदर्भ ...

**मा. आयुक्त :-**

तुम्ही आम्हाला मार्ग सांगा ना.

**प्रविण पाटील :-**

मार्ग खुप आहेत.

**मा. आयुक्त :-**

खुप म्हणून चालत नाही. ॲक्ट प्रमाणे....

**प्रविण पाटील :-**

जास्त कर वाढल्यामुळे योजना रद्द होतील. अस मग तुम्ही सांगु नका.

**मा. आयुक्त :-**

योजना मंजूर होणारच नाही कर वाढ केली नाही तर.

**प्रविण पाटील :-**

उत्पादनाचे स्त्रोत दुसरे पण आहे ना.

**मा. आयुक्त :-**

साहेब, दुसरी योजना नाही. तुम्ही परच्युटन सांगुन काय उपयोग आहे?

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब प्रशासनाने ११८ नंबरचा जो गोषवारा दिलेला आहे आणि विषय आणलेला आहे. शहरामध्ये डेव्हलपमेन्ट होतात. सगळी, सोंग आणता येतात. पैशाची सोंग आणता येत नाही. परंतु, हा जो दरवाढीचा प्रस्ताव दिलेला आहे. मुळात हा गोषवारा त्यांचा चुकीचा आहे. आणि त्याचा व्यवस्थित अभ्यास झालेला नाही. सन २००६ मध्ये मा. महासभेमध्ये ठराव झाला होता त्यांनी तो चार्ट दिलेला आहे. त्याच्या नंतर कुठच्याही प्रकारचा सर्व्हे प्रशासनाने वास्तविक नविन प्रोव्हिजन द्यायला पाहिजे. नविन सर्व्हे द्यायला पाहिजे होता. आता यामध्ये काजुपाडा, वर्सोवा, चेणे, माशाचा पाडा. हा जो भाग दिलेला आहे. हा मिरा गावठण, महाजन वाडी, घोडबंदर, आदीवासी पाडा. त्यामध्ये आर.सी.सी. कन्स्ट्रक्शन काहीच नाही का? प्रशासनाने इथे डॅश दाखवले आहे. आजच्या डेटला या ठिकाणी आर.सी.सी.च्या कन्स्ट्रक्शनच्या किती बिल्डींग आहेत किंवा अजिबात नाही. मिरा गावठण मध्ये बिल्डींग आहेत की, नाही !

**प्रविण पाटील :-**

साहेब, माशाचा पाड्यामध्ये मोठे-मोठे कॉम्प्लेक्स झालेले आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब, तुम्ही ६ नंबरचा जो विभाग दिलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

साहेब, प्रश्न असा आहे की, तिथे आदिवासी कुटूंबासाठी हा दर आहे. आम्ही तिथे आदिवासी कुटूंब लिहिलेल आहे. आणि हे जे ३ नंबरला आहे. त्यामध्ये आम्ही आर.सी.सी च कवर केलेल आहे म्हणजे अभ्यास केला नाही हे म्हणन पूर्ण चुकीच आहे.

**अनिल सावंत :-**

या ठिकाणी फक्त आदिवासी कुटूंबासाठी दिलेल आहे.

**मा. आयुक्त :-**

आम्ही आदिवासी कुटूंबासाठी म्हंटलेल आहे.

**अनिल सावंत :-**

पण, २००६ चा जो ठराव झालेला आहे. त्याच रूपात दिलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

साहेब, ३ नंबरला दिलेल आहे ते बघा.

**अनिल सावंत :-**

या विभागामध्ये आदिवासी सोडून इतर लोक राहत नाही का?

**मा. आयुक्त :-**

राहतात, त्यांना हे दर लागणार. घोडबंदर, काशिमिरा महाजनवाडी, चेणा वर्सोवा, गावठण.

**अनिल सावंत :-**

आता माझ्याजवळ एक बिल आहे. २००६ च्या ठरावाप्रमाणे जर तुम्ही त्याच्यामध्ये मुल्यमापन करून बिल पाठवता. तुमचा जो रेट दिलेला आहे. त्याप्रमाणे रेटेबल व्हॅल्यू काढून दाखवा. ६७१ एरिया आणि रेटेबल व्हॅल्यू ८६९६ दिलेला आहे. तुम्ही जुनी आकारणी जी दिलेली आहे. त्याप्रमाणे काढून दाखवा. तुमचा आर.सी.सी. चा रेट १ रू. ६० पैसे आहे. आणि ६७१ एरिया आहे.

**मा. आयुक्त :-**

९५ चा रेट आहे.

**अनिल सावंत :-**

मग, २००६ च्या ठरावाची अंमलबजावणी झाली का?

**मा. आयुक्त :-**

२००६ चा ठराव तेथून पुढच्या बांधकामाला सुरूवात होते. रेटेबल व्हॅल्यू कधी चेंज होत नाही.

**अनिल सावंत :-**

मग, आता हे जे रेट आहे ते तुम्ही पुढच्या बांधकामाला देणार आहे की, जो रेट देणार आहात?

**मा. आयुक्त :-**

पुढच्या बांधकामाला?

**अनिल सावंत :-**

ह्याच्यानंतरच्या बांधकामाला देणार. ऐक्जेस्टींग बांधकामाला हा रेट लागु नाही.

**मा. आयुक्त :-**

नाही आहे.

**अनिल सावंत :-**

आर यु शुअर?

**मा. आयुक्त :-**

शुअर.

**अनिल सावंत :-**

मला वाटत काहीतरी चुकी होते.

**मा. आयुक्त :-**

नाही. चतु:वार्षिक कर आकारणी झाली तेच सर्वांच राहणार आहे.

**अनिल सावंत :-**

आता जो रेट आहे तो जुनाच रेट राहणार आहे.

**शरद पाटील :-**

नक्की सांगता आता जो जुना रेट आहे तोच राहणार आहे.

**याकुब कुरेशी :-**

जुन्या लोकांचा जो रेट आहे तोच राहणार आहे.

**अनिल सावंत :-**

रेटेबल व्हॅल्यू ला जो रेट राहणार आहे तो कुठचा राहणार आहे. तो कुठचा राहणार आहे.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.)) सो. :-**

स्टॅन्डर्ड रेट फिक्स आहे.

**अनिल सावंत :-**

मला एक सांगा, तुम्ही हा जो चार्ट दिलेला आहे, नविन प्रस्तावित दर दिलेले आहे. हे ह्यापुढे जे कन्स्ट्रक्शन्स होणार आहे. त्यांना लागु आहे. ऑलरेडी जे ॲक्जेस्टींग आहेत त्यांना लागु नाही.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.)) सो. :-**

स्टॅण्डर रेट म्हणजे जुन्या बांधकामाचा दर हा ५ वेगवेगळ्या प्रकाराने बदलता येतो. ते न वगळता जुन्या बांधकामांना दर लागु होणार नाही.

**मा. आयुक्त :-**

त्यांनी रिन्युयेशन केल तर.

**अनिल सावंत :-**

म्हणजे टोटली बांधून परत नविन केल.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.)) सो. :-**

रि कन्स्ट्रक्शन त्यानी पॉलिश केली.

**मा. आयुक्त :-**

आता तुम्ही म्हणणार. पूर्वी एखादी जुनी बांधकाम पाडल आणि तिथे नविन बांधल तर हा रेट लागु होणार.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, बी.पी.एम.सी. ॲक्ट मध्ये रेटेबल व्हॅल्यूच्या किती टक्के टॅक्स आपण नागरिकांकडून वसुल करू शकतो. आय एम टॉकींग अबाऊट टोटल बिल.

**मा. आयुक्त :-**

त्यामध्ये जास्त दर दिलेले नाही.

**अनिल सावंत :-**

त्याच्यात दिलेले आहे.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

किमान १२ आहे मॅक्झीमम दिलेले नाही.

**मा. आयुक्त :-**

१२ म्हणजे ऑथोराइझड आहे.

**अनिल सावंत :-**

टोटल टॅक्स आहे. हाऊस टॅक्स, ट्री टॅक्स, एज्युकेशन टॅक्स, दॅट शुल्ड नॉट बी ॲक्झीड ५२ टक्के ऑफ दि रेटेबल व्हॅल्यू.

**मा. आयुक्त :-**

प्रत्येक ह्याच १२ टक्के आहे. पाणी पुरवठा लागत.......

**अनिल सावंत :-**

साहेब, ती माहिती करून घ्या. इट शुल्ड नॉट बी ॲक्झीड ५२ टक्के ऑफ दि रिटेबल व्हॅल्यू. अस आहे.

**मा. आयुक्त :-**

आता बॉम्बे मध्ये ९१ टक्के टॅक्स आहे.

**अनिल सावंत :-**

९१ टक्के ऑफ रिटेबल व्हॅल्यू.

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

लॅण्ड कॉस्ट ॲण्ड कन्स्ट्रक्शन कॉस्ट. कॅपीटल इनवेस्टमेंट मेथॉड.

**अनिल सावंत :-**

ते तुम्ही कनफम करा. रिटेबल व्हॅल्यू च्या मॅक्झीमम किती टक्के टॅक्स आपण नागरिकांनकडून वसुल करू शकतो. कोणाचेच ५२ टक्के च्या वर नाही. आय एम टॉकींग अबाऊट रिटेबल व्हॅल्यू. रिटेबल व्हॅल्यू ला किती दर पकडतात, दॅट इझ नॉट इश्यु.

**मा. आयुक्त :-**

आम्ही तुम्हाला यादी देवू ना.

**सुधिर राऊत :-**

पुण्यामध्ये ३८ टक्के दर होता. आता आता त्यांनी २२ टक्के वाढ करायचा सांकेतिक दरामध्ये.

**अनिल सावंत :-**

५० टक्के झाला ना.

**मा. आयुक्त :-**

ते फक्त प्रॉपर्टी टॅक्स.

**सुधिर राऊत :-**

फक्त सामान्य कर पुण्याचा साफसफाईचा कर १३ टक्के आहे. अग्निशमन कर ७५ टक्के, वृक्ष उपकर ५ टक्के आहे. विशेष साफसफाई कर १० टक्के आहे. ह्याच्यानंतर मलप्रवर्तन ४ टक्के आहे. पाणी पुरवठा कर २ टक्के, हस्तकलेत ५ टक्के .....

**अनिल सावंत :-**

हे जे रेट दिलेले आहे ते नविन कन्स्ट्रक्शन्स ला लागु आहे.

**शरद पाटील :-**

सन्मा. सदस्य अनिल सावंत साहेब, आपली गोष्ट खरी आहे. साहेबांनी सांगितल ते खर आहे. मग ही टिपणी लिहताना सगळी टायपिंग मिस्टेक आहे का? या टिपणीमध्ये तस दिल असत तर तस काय त्रास झाला असता का? त्याच्यात कुठे उल्लेख आहे का?

**मा. आयुक्त :-**

म्हणजे हे दर यापुढे लागु होणार नाही. यावर विश्वास नाही का?

**शरद पाटील :-**

आम्हाला ते बोलायच नाही. ह्याच्यात विश्वासाचा प्रश्न कुठे येतो? जेव्हा लिखित चालल आहे तिथे विश्वासाचा प्रश्न कुठे आला?

**मा. आयुक्त :-**

तुमच जो ठराव होतो तो त्यानंतरच लागु होतो. मग, लिहिण्याची आवश्यकता काय आहे?

**शरद पाटील :-**

साहेब, तुम्ही प्रत्यक्ष माहिती देत नसाल.

**मदन उदितनारायण सिंह :-**

गोषवारा अपूर्ण असेल तर त्याची काय गरज आहे.

**मा. आयुक्त :-**

लिहिण्याची आवश्यकता नाही. २१ वयावरून १८ वयावर मतदानाला राहिल. ते त्या तारखेनंतर लागु झाला.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. सभापती साहब, नया कन्स्ट्रक्शन्स होनेवाला है। उसको टॅक्स लगाने वाला है। इन लोगो मे इतना भय हो गया है की, कचरा सफाई शहर का होता नही और टॅक्स बढाते है। मुंबई समाचार मे बातमी है की, महानगरपालिका टॅक्स बढाती है। और शहर की साफसफाई होती नही। जैसे होनी चाहिए वैसे होती नही है।

**मा. आयुक्त :-**

सब को प्रॉब्लेम मालुम है ना। गाव वालो को भी मालुम है।

**चंद्रकांत मोदी :-**

आपने बोला नविन बांधकाम जो होनेवाला है उसको यह टॅक्स लगने वाला है।

**मा. आयुक्त :-**

जो गाव मे प्रॉब्लेम चल रहा है। यह सबको मालुम है। आपको मालुम नही है। यह नई बात नही है। इसके पहले जो प्लान्ट चालू था। उस वक्त कोई भी बतानेके लिए नही आया।

**चंद्रकांत मोदी :-**

साहब बातमी ऐसी है आपके गोषवारा के अनुसार ही आया है।

**मा. आयुक्त :-**

पेपर के उपर इधर डिस्कसन ही नही होता है। कौनसा भी न्युज पेपर रहे।

**चंद्रकांत मोदी :-**

लेकिन सभी लोगो मे डर रहता है ना।

**मा. आयुक्त :-**

हर एक आदमी हर एक तरीकेसे देखेगा। आपको कॉर्पोरेशऩ चला है वह सोचो। न्युज के उपर मत जाओ।

**प्रविण पाटील :-**

साहेब, हा एकच मार्ग नाही.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही जो आक्षेप घेतला. महापालिकेला नविन कर आकारणीसाठी जे भाडे मुल्याचे दर आहेत त्यामध्ये वाढ केल्यास महापालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होवू शकेल. म्हणजे यापुढे जे दर लावायचे आहे. नविन कर आकारणी म्हणजे यापूर्वी झालेल्या आकारणी नाही. नविन कर आकारणी म्हणजे यापुढे होणाऱ्या कर आकारणी महापालिका नविन कर आकारणीसाठी जे भाडे मुल्य दर आहेत नविन घराला नविन कर झालेल्या आकारण्या.

**प्रविण पाटील :-**

नविन बांधकामाला कर नाहीतर पावत्या येतील त्यांना पण तुम्ही देणार.

**मा. आयुक्त :-**

अस होणारच नाही.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, प्रशासनाने जे प्रस्तावित नविन दरवाढ दिलेली आहे. त्यामध्ये संपूर्ण शहराच्या हिताशी हा निगडीत प्रश्न आहे. नविन कन्स्ट्रक्शन हा बिझनेस सुध्दा अस्तित्वात राहिला पाहिजे. हे सुध्दा विचारात घेवून ह्या विभागांमध्ये येणाऱ्या काळामध्ये त्यांच एक्सपेक्शन काय आहे. किती बिल्डींग्स वैगेरे तयार होणार आहे? किती परमिशन त्यांनी दिलेली आहे किती नविन कर आकारणी होणार आहे? हा सविस्तर प्रस्ताव ठेवून मा. महासभेपुढे ठेवावा.

**मा. आयुक्त :-**

असा अंदाज बांधता येत नाही. कारण, एन.ए. कलेक्टरने बंद केलेल आहे. इस्टेट इनवेस्टमेंन्टवर ७/१२ वर नाव आलेल आहे. त्यामुळे बांधकाम किती होणार आहे. आम्ही भविष्य सांगणार नाही. बांधकाम होतील त्यावर आकारणी करू.

**प्रविण पाटील :-**

तुम्ही हा विषयच कशाला आणता?

**मा. आयुक्त :-**

तुमच मत नसेल तर रिजेक्ट करा ना. आम्ही कुठे म्हणतो की, मंजूर करा म्हणून.

**प्रविण पाटील :-**

माझ तर मत नाहीच आहे.

**मा. आयुक्त :-**

तुमच मत काय आहे त्याप्रमाणे ठरवा ना. कुठल्याही योजना घ्यायच्या नाहीत.

**प्रविण पाटील :-**

योजनासाठी मनाई नाही. साहेब, हा एकच मार्ग नाही.

**मा. आयुक्त :-**

हा एकच मार्ग आहे. दुसरा मार्ग नाही.

**प्रविण पाटील :-**

साहेब, तुम्ही संबंध या करवाढीची लावू नका.

**मा. आयुक्त :-**

दुसरा मार्ग नाही.

**प्रविण पाटील :-**

आणि करवाढीमुळे योजना येणार अशातला भाग नाही.

**मा. आयुक्त :-**

कर वाढ केल्याशिवाय कोणत्याही योजना येणार नाही. आणि महापालिकेला मंजूर करून मिळणार नाही.

**प्रविण पाटील :-**

फक्त करवाढीमुळेच योजना येणार आहे का?

**मा. आयुक्त :-**

प्रोसिडींगमध्ये माझ हे वाक्य नमुद करा.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहब, आज अस्थापणामे खर्च कितना है।

**प्रविण पाटील :-**

कर वाढ केली तरच योजना येईल अस तुमच म्हणन आहे का?

**मा. आयुक्त :-**

हो.

**प्रविण पाटील :-**

बाकी काय केल तर होणार नाही.

**मा. आयुक्त :-**

तुम्हाला बाकी दुसर सोर्सच उत्पन्न वाढवायला नाही.

**प्रविण पाटील :-**

अस काय सांगता. महानगरपालिकेकडे करवाढी हा एकच सोर्स आहे का?

**मा. आयुक्त :-**

सल्लागार म्हणून यांनी पुढच देवू द्या. मग, हे पुढच्या वेळेला तुमच.....

**प्रविण पाटील :-**

तुम्ही सांगा फक्त ही एकच आहे की करवाढीमुळे ही योजना येणार आहे. आम्ही कधीपासून बोलतो कर वाढी केली नाही तर योजना नाही. फक्त हा एकच मार्ग आहे का?

**मा. आयुक्त :-**

हो दुसरा मार्ग नाही. तुम्ही मला दुसरा मार्ग सांगा.

**प्रविण पाटील :-**

तुम्ही सांगा हा एकच मार्ग आहे.

**शरद पाटील :-**

साहेब, दुसरा मार्ग म्हणजे तुम्ही त्याला १०० टक्के आकारणी करून घ्या. हे होईल. त्याच्यात पण तेवढच पैसे मिळणार आहे.

**मा. आयुक्त :-**

महापालिकेच ७७ कोटी डिमान्ड आहे. प्रॉपर्टी टॅक्स आणि पाणीपट्टीच. ते डिमान्ड वर आपली आता, वसुली किती केली ते बघत नाही. तुमच येण किती आहे ते बघतात. यावरच योजना मंजूर होणार ना. आता तुमची लोन घेण्याची कॅपेसिटी संपली. तर, तुम्हाला योजना दाखवण्यासाठी तुमच्याकडे पैसे बॅलेन्स राहतात हे दाखवल्याशिवाय तुमच्याकडे योजना कुठल्या मंजूर होणार आहे. ५० टक्के घालायची कॅपेसिटी त्याच्यात आहे.

**शरद पाटील :-**

साहेब, अस पण तुम्ही अशाच एका विषयात येणार आहे की, येणे बंद असल्यामुळे या शहरात बांधकाम होत नाही.

**मा. आयुक्त :-**

होत नाही अस माझ म्हणन नाही. कमी प्रमाणात होतील.

**शरद पाटील :-**

कमी प्रमाणात होतात.

**मा. आयुक्त :-**

म्हणजे तुम्ही जो अंदाज करतात. त्या अंदाजपत्रकाप्रमाणे होणार.

**शरद पाटील :-**

कमी प्रमाणात होतात ना. मग, त्याच्यात वाढुन वाढून किती वाढणार. ह्या टॅक्स मध्ये आपले किती पैसे वाढतील जर वाढवल तर? सध्या बांधकाम कमी होत ना.

**याकुब कुरेशी :-**

साहेबांचे म्हणणे असे आहे. की, वाढवून वाढवून आपल्याला नाही. आपण फक्त वाढवून दाखवल आहे. हे केंद्र शासनाला किंवा दाखवायच आहे.

**मा. आयुक्त :-**

कशा कशात वाढ केली ते सांगायला लागणार. यादी दाखवायला लागणार ना. आम्ही आर्थिक सुधारणा काय केली यामध्ये सगळी यादी करून त्यांना कळवणार. त्यामुळे आम्हाला इतक उत्पन्न मिळणार आहे. म्हणजे तुमच रि-पेमेन्ट आम्ही अस करू. किंवा ५० टक्के रक्कम आम्ही अस घालणार आहे. असे दाखवात येत.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहब. इसके अलावा भी आज अपना आस्थापना खर्च वढते जा रहा है। आज आस्थापना खर्च कितना है?

**मा. आयुक्त :-**

मै आने के बाद १ टक्के भी नही बढा है ।

**मदन उदितनारायण सिंह :-**

अभी इधर कितना है?

**मा. आयुक्त :-**

पहले ही बढाया मे जाने के बाद।

**मदन उदितनारायण सिंह :-**

तो उसपर ध्यान दो।

**मा. आयुक्त :-**

पहला ८ टक्के था। एशिया खंड मे १ टक्का कॉर्पोरेशन है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

आज अस्थापना खर्च कितना है?

**मा. आयुक्त :-**

आज अस्थापना का खर्च ४१ टक्का है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

४१ टक्का नही है। उसे ज्यादा है।

**मा. आयुक्त :-**

पहले सेनिटेशन मे १६४१ आदमीओको लगाया। कम्प्युटरवाले ८० लोगो को लगाया। Tree platition पे १५० लोग लगाया था। हमने कम करके अभी ४० पे आगये।

**मदन उदितनारायण सिंह :-**

आज कम्प्युटर वाले ८० लागोको लगाया लेकिन जन्म मृत्यु मे लोगो को दाखला नही मिलता है।

**मा. आयुक्त :-**

हमारे यहा जितनी जल्दी दाखला मिलता है उतने ही जल्दी किसी और के यहॉ नही मिलता है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

मतलब जो चल रहा है सब ठिक चल रहा है।

**मा. आयुक्त :-**

मैने गलत क्या बताया।

**मदन उदितनारायण सिंह :-**

मै बतात हुॅ ना। मै सुबह जन्म-मृत्यु विभाग मे गया था ११.०० बजे के बाद फॉर्म नही लेते है। अपने कर्मचारी १०.३०, ११.०० बजे आते है। और ११.०० बजे फॉर्म लेना बंद करते है। वहॉपर मे गया था तो तभी १००-१५० लोगों की लाईन लगी थी। पहले सुविधा पे ध्यान दे। लोगो को सुविधा नही देंगे खाली कर बढाते जायेंगे। तो वह भी नही चलेगा ।

**मा. आयुक्त :-**

सुविधा क्या नही है। कॉर्पोरेशन ने क्या करना चाहिए। सुविधा यानी घरपे जाके देना चाहिए। सुविधा यानी क्या?

**मदन उदितनारायण सिंह :-**

जन्म मृत्यु का आप बात लिजिए ना। जन्म मृत्यु मे आप जाकर देखिए वहॉपर पोजिशन क्या है? आज हम किसीको दाखला नही दे सकते?

**जुबेर ईनामदार :-**

साहेब, तुमची भुमिका शहरामध्ये नविन योजना आणने.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मै क्या बोलता हुॅ की, अपने को योजना लानी है, शहर का विकास करना है। लेकिन कहॉ हम काटकसर कर सकते है। कहॉ सही ढंग से लोगो को सुविधा दे सकते है। यह देखनेकी जरूरत नही है क्या? खाली बढाते जाना है क्या?

**मा. आयुक्त :-**

काटकसर कहॉ-कहॉ किया हुॅआ है। आप ऑफीस मे आओ....

**मदन उदितनारायण सिंह :-**

लेकिन जो हम देख रहे है। जन्म-मृत्यु की हालत देखिए क्या है?

**मा. आयुक्त :-**

पहले काटकसर किस-किस मे हुई है वह आपको दिखाता हूॅं।

**मदन उदितनारायण सिंह :-**

जन्म-मृत्यू मे ११ बजे फॉर्म लेना बंद करते है।

**जुबेर ईनामदार :-**

साहेब, खर्च वाढला की उत्पन्न वाढल पाहिजे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आज आयएसओ मिला है। लेकिन लोगो की नजर मे आयएसओ है क्या?

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

साहेब, ११.०० वाजेपर्यंत फॉर्म घेतो त्यानंतर ते दुपार पर्यंत तयार करतो आणि नंतर इशु करतो.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आपले कर्मचारी रोज १०.३०, ११.०० वा. येतात.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

आपण रोज ७०० ते ८०० बर्थ सर्टिफिकेट आणि डेथ सर्टिफिकेट देतो.

**मदन उदितनारायण सिंह :-**

फॉर्म घेत नाही. आम्ही जे म्हणतो ते चुकीच आहे का?

**मा. आयुक्त :-**

तलाठीने काम केल नाही तर तहसिलदाराकडे जाते. तहसिलदाराने काम केल नाही तर प्रांताकडे जाता. प्रांताने काम नाही केल नाही तर कलेक्टरकडे जाता. तुम्ही एक दिवस तरी तक्रार करायला या. आता आम्ही थम घ्यायला मशिन घेतली होती. त्यावेळेला काही लोकांनी चिंगम चिटकवल, काही लोकांनी पाणी ओतल. नंतर आम्ही सिक्युरिटीच्या ताब्यात दिल. आता सिक्युरिटीप्रमाणे ज्यांच थंब होत त्यांचाच पगार काढणार आहे. आम्ही हे आदेश दिलेले आहे, आम्ही काय केल? ते सिक्युरिटीच्या ताब्यात मशिन बिघडली. आणि कोणता अधिकारी-कर्मचारी थंब न करता आत आला तर सिक्युरिटी वर ॲक्शन होणार आणि सिक्युरिटीला काढून टाकणार. आता, सिक्युरिटीच्या ताब्यात बॉक्स करून दिलेले आहे. आणि कोणताही कर्मचारी पावणे दहा ते दहा वाजेपर्यंत या टेन्युअरमध्ये थम केल तरच पगार मिळणार नाही तर पगार मिळणार नाही. आणि प्रभाग कार्यालय मध्ये पण बसवल इथे पण बसवल आहे. कोणाची काय किरकोळ तक्रार असेल तर वेगवेगळ्या तक्रारसाठी माझ्याकडे या. किंवा फोनवर जरी सांगितल तर मग मला काय करायच ते मी करेन. फोनवर तरी सांगायला पाहिजे की, साहेब, मी फॉर्म घ्यायला एवढ्या वाजता आलो.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहब, तक्रार की बात ऐसी है। मे पिछले ३ महिनेसे अतिक्रमण की तक्रार कर रहा हूॅं। आज सुबह टूटा लेकिन टुटने के पहले हमारा नाम वह पहले पहूच जाता है।

**प्रविण पाटील :-**

आपले अधिकारी तिथे जावून सांगतात की, यांनी तक्रार केलेली आहे.

**अनिल सावंत :-**

याचा अर्थ असा की, जे.इ. आणि प्रभाग अधिकारी नाव सांगतात.

**मा. आयुक्त :-**

तोडणारे तेच आहे तर सांगतात अस आपल्याला म्हणायला पाहिजे.

**अनिल सावंत :-**

यापूर्वी यांना ताकिद दिली होत की, नाव सांगु नका. तरी सुध्दा ते नाव सांगतात.

**मा. आयुक्त :-**

सांगितल असेल अशी यांची तक्रार आहे. तर मी नंतर त्यांना बोलवून घेवून विचारतो.

**अनिल सांवत :-**

त्यांना बोलवा. त्यांच्यावर कारवाई करा.

**मा. सभापती :-**

साहेब, जर नगरसेवक कुठल्याही प्रकारची तक्रार करतात ना. कुठलेही असो. सफाई कामगार असो, फेरिवाले असो, अतिक्रमण असो, लेटर गेलं की त्या व्यक्तीच नगरसेवकाच नाव समोर जात. हे आपल्या महानगरपालिकेच्या अधिकारी कडुन पुन्हा हा प्रकार घडला नाही पाहिजे. हे एकदम अयोग्य आहे.

**मा. आयुक्त :-**

अतिक्रमण काढा म्हणून काहीजण येतात. आणि काढलेल परत द्या. म्हणून काहीजण येतात. बांधकाम तोडा म्हणून काहीजण येतात, तोडू नका म्हणून काही जण येतात. म्हणजे आम्ही वागायच कसं?

**मा. सभापती :-**

साहेब, आपण या बाबतीमध्ये नाव डिक्लर कराना.

**जुबेर ईनामदार :-**

कायदयाच्या दृष्टीकोनातुन जे बरोबर असेल तेच करा.

**मा. सभापती :-**

इललिगल कंन्स्ट्रक्शन तोडताना जर कोणी नगसेवकांनी अडवल तर त्यांनी नाव डिक्लर करा.

**जुबेर ईनामदार :-**

मा. सभापती साहेब, मला दर वाढीचा विषयावर बोलायच आहे. हा विषय कसा आहे. कुटूंबामध्ये खर्च वाढला तर उत्पन्न ही वाढल पाहिजे. प्रशासनाने हा विषय आणला चुकीचा नाही. मात्र स्थायी समितीसाठी ही वैदानिक समिती आहे. तर, हा विषय स्थायी समितीमध्ये येवून चर्चेला चालणार नाही. हा विषय मा. महासभेपुढे गेला पाहिजे. प्रत्येक लोकप्रतिनिधीला बोलायची संधी मिळाली पाहिजे. तिथ या विषयावर व्यवस्थित चर्चा होवून नंतर या विषयाचा काय निर्णय घ्यायचा तो घेता येईल. म्हणून माझी सुचना अशी आहे की, हा जो दर वाढीचा विषय आहे हे सर्वे विषय आहे तो सर्वच्या सर्व विषय मा. महासभेसमोर जावू द्या. प्रत्येक लोकप्रतिनिधींना आपले विचार मांडायची संधी मिळेल. त्यांच्या बाजूने बोलतो की, हा विषय जो आहे तो डायरेक्ट कनझ्युमर मध्ये शहराचे रहिवाशी आहेत त्यांना निगडीत आहे. त्यांना त्याचा प्रभाव पडणार आहे.

**मा. आयुक्त :-**

नविन येणाऱ्या.

**जुबेर ईनामदार :-**

साहेब, असु द्या. नविन आले तरी, साहेब, येणारी लोक ही उद्या आपलीच होणार. प्रशासनाने आणलेला विषय चुकीचा आहे अस मी कधीच बोलणार नाही. कारण, उत्पन्न वाढले पाहिजे. फक्त कर वाढ, पाणीपट्टी वाढ, हाच विषय उत्पन्न वाढवण्याकरिता कमी पडला. बाकीच विषय आणखीन जास्त.

**मा. आयुक्त :-**

साफसफाई कर घ्यायला पाहिजे. पाणी लाभकर.......

**जुबेर ईनामदार :-**

फक्त उत्पन्न या शहराचा महापालिकेचा वाढला तरच तुम्ही सुखसुविधा देवू शकाल तरच योजना आणु शकता.

**मा. आयुक्त :-**

पाणी पुरवढा लाभकर लावला तर योजना येणारच नाही.

**जुबेर ईनामदार :-**

साहेब, हे खर आहे. म्हणून हे जे काही विषय आहेत ते मा. महासभेसमोर चर्चेला जावू द्या. मा.य सभापती साहेब, ही माझी सुचना आहे. या सुचनेप्रमाणे आपण ठराव करूया.

**प्रविण पाटील :-**

साहेब, स्थायी समितीमध्ये या प्रस्तावाला माझा विरोध आहे. साहेब, आपण आज किती सुविधा देतो. प्रत्यक्ष कर भरणारा माणुस खालचा असतो. जो कर भरणारा माणुस आहे तो साधा माणुस आहे. त्या माणसापर्यंत आपली महानगरपालिका किती सुविधा देते.

**मा. आयुक्त :-**

सुविधाच्या शब्दामध्ये काय-काय दडल ते सांगा ना. म्हणजे तुम्हाला सांगतो.

**प्रविण पाटील :-**

कचरा भरलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

कचऱ्याला आताच प्रॉब्लेम झाला आहे हे सगळ्यांना माहित आहे.

**प्रविण पाटील :-**

वेळेवर. पाणी येत नाही. पाण्याच ठिकाण नाही. परत, आमच्या इथे भरतीच पाणी भरत. हा प्रस्ताव जर तुम्ही आज घेवून गेला तर लोक आम्हाला उभे ठेवणार नाही. तुम्ही कर कुठल्या आधारावर मागायला येता. आज कर वसुली करायला जातात त्यांना काय-काय शब्द ऐकायला येतात ते त्यांना विचारा. कर घ्यायला येतात. आमच्याकडे रस्ते बरोबर नाही.

**मा. आयुक्त :-**

पाणी अजिबात येत नाही.

**प्रविण पाटील :-**

अजिबात नाही बोललो. वेळेवर येत नाही.

**मा. आयुक्त :-**

जर, साफसफाई झाली नाही तर प्रत्येक गल्लीमध्ये दहा-दहा ट्रक कचरा दिसायला पाहिजे.

**प्रविम पाटील :-**

साहेब, ज्याप्रकारे व्हायला पाहिजे सत्या प्रकारे होत नाही. ज्या प्रकारे आपण कर देतो ना.

**मा. आयुक्त :-**

साहेब प्रत्येकांना पध्दत असते ना. ज्या पध्दतीने वागायला पाहिजे तस वागत नाही. ज्यांच्या त्यांच्या दृष्टीप्रमाणे असत.

**प्रविण पाटील :-**

कर वाढवतांना मग, आपण तशा त्यांच्या सुविधा पण वाढवायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही वर्षानुवर्षे मिरा भाईंदरमध्ये राहिलात. त्यामुळे मिरा भाईंदरच्या ज्या सुविधा आहेत ते दररोज तुमच्या नजरेपुढे आहे. त्यामुळे ते कमी वाटतात. दुसऱ्या महापालिका हद्दीत थोडे दिवस राहून आल्यानंतर तिथली सुविधा वाटेल ना. त्यावेळेला समजेल ना. जो पर्यंत दोन माणस उभी करणार येणार नाही. त्यावेळेला कंम्पोरीजन करता येणार नाही. आपल्या सुविधा आहेत. परंतु, तुम्ही वर्षानुवर्षे इथेच राहिल्यामुळे महापालिका काही काम करत नाही अस झाल असत.

**प्रविण पाटील :-**

महापालिका काम करत नाही अस नाही. ज्याप्रमाणे करायला पाहिजे. त्याप्रमाणे कर वाढवू नका. नंतर कधीतरी ज्यावेळी योग्य सुविधा द्याल.

**मा. आयुक्त :-**

तुमच्या इच्छेनुसार कधीच योग्य सुविधेच पूर्ण होणार नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य प्रविण पाटील दरवाढ आपण करणार आहोत. त्यांनी आपल्याकडे ठेवलेल आहे. ते वाढवणार नाहीत.

**प्रविण पाटील :-**

साहेब, आमचा विरोध आहे. बाकी मला काही बोलायच नाही.

**मा. सभापती :-**

विषय मंजूर झाला नाही.

**सुधा व्यास :-**

हमारा भी विरोध है।

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य प्रविण पाटील आणि मॅडम तुम्हाला एक सांगतो. अजून कुठल्या बाबतीमध्ये विषय मंजूर झाला आहे का?

**प्रविण पाटील :-**

तुम्ही विषय मा. महासभे पर्यंत पाठवण्याच्या अगोदर ...

**मा. सभापती :-**

हा विषय मा. महासभेमध्ये पाठवण्यासाठी तुमचा विरोध आहे का?

**प्रविण पाटील :-**

हो. तुम्ही करावा की न कराव हा तुमचा प्रश्न पण, माझा या कर वाढीला विरोध आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य प्रविण पाटील करवाढ केली कुठे अजून केली नाही.

**प्रविण पाटील :-**

तस सांगायला पाहिजे होत की, मा. महासभेत हा विषय पाठवायच आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मा. महासभेत पाठवतो ना.

**प्रविण पाटील :-**

सर्वानुमते नाही पाठवत.

**मा. सभापती :-**

तुमचा विरोध आहे का?

**प्रविण पाटील :-**

माझा विरोध आहे.

**मा. सभापती :-**

मा. महासभेला पाठवायचा नाही असा तुमचा विरोध आहे.

**प्रविण पाटील :-**

मा. महासभेला पाठवायच नाही अस नाही. माझा करवाढीला विरोध आहे.

**शरद पाटील :-**

मी काय सांगतो की, करवाढीला विरोध आहे. मा. महासभेमध्ये पण पाठवू नका. ह्याला इथेच संपवून टाका.

**मा. सभापती :-**

मा. महासभा निर्णय घेईल. जो काय निर्णय आहे कर वाढवायचा की नाही मा. महासभा घेईल. आपली मा. महासभा सुप्रिम आहे ना.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, मा. महासभेमध्ये पण जायला स्टॅण्डींगचा ठराव लागतो ना.

**मा. सभापती :-**

मा. महासभेमध्ये जाण्यासाठी आपल्या स्टॅण्डींग मध्ये विषय कशासाठी आणलेला आहे. याची आवश्यकता आहे ना.

**प्रविण पाटील :-**

तुम्ही करू शकता ना. अस काही नाही.

**मा. सभापती :-**

तुम्हाला एवढच माहीत आहे इथे काय निर्णय होतो त्याची माहिती नाही.

**मा. आयुक्त :-**

१ एप्रिल पासुन जकात बंद आहे. आणि स्थानिक कर म्हणून लागू होणार आहे. त्यामध्ये आपण जकाती एवढी रक्कम वसुल करू अशी शंका आहे. हा नविन कर आहे. वसुल करता घडी बसवता-बसवता वेळ जाईल. आणि या सगळ्या योजना जर राबवायच्या असतील पुढच ५० वर्षाचा विचार करून आपण कुटूंबाचा विचार करतात तसेच महापालिकेचा पण विचार केला पाहिजे. पुढच्या काळामध्ये आपण इथे योजना काय-काय घेणार आहोत. आता जकात बंद झाल्यानंतर पगार होणं पण मुश्किल आहे. कारण, तिथे ५० टक्के रक्कम आपल्याला त्रास हातो. हा अनुभव मिरा भाईंदर महापालिकेने घेतलेला आहे.

**याकुब कुरेशी :-**

मी तुम्हाला एक प्रश्न विचारतो. हा जो प्रस्ताव आणलेला आहे. तो फक्त जे नविन येणार आहे त्यांनाच आहे ना.

**मा. आयुक्त :-**

१०० टक्के.

**याकुब कुरेशी :-**

माझ्या मते हरकत नाही.

**मा. आयुक्त :-**

आणि आता जे अंडर ग्राऊण्ड ड्रेनेज आहे ते सुध्दा बंद कराव लागेल. कारण, लोन .....

**याकुब कुरेशी :-**

माझ अस मत आहे की, सभागृहाने त्याला मंजुरी द्यावी. नविन कर आकारणी जी होईल ती नविन बांधकामास आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

नविन इमारतीला होणार ना. पण आता अजून कुठे टॅक्स लागलेले नाही. त्यांना काय.

**प्रविण पाटील :-**

त्यांना पण होणार.

**ग्रिटा फॅरो :-**

जूना की, नविन.

**मा. आयुक्त :-**

नविन लोकांना लागू होणार जून्या घरांना लागू होणार नाही.

**ग्रिटा फॅरो :-**

आता बिल्डींग्स आहे. समजा १० फ्लॅटला टॅक्स लागलेला आहे. ५ बाकी आहे. त्यांच काय !

**मा. आयुक्त :-**

५ बाकी आहे ना त्यांना जुन्या कराप्रमाणे लागू होईल.

**मा. सभापती :-**

मॅडम, आपल्याला ह्याच्यावर चर्चा करायची गरज नाही. दर वाढीचे सगळे विषय आपण मा. महासभेमध्ये ठराव मंजूर करून पाठवतो.

**मा. आयुक्त :-**

यामध्ये नविन प्लॅनिंग. ऑथोराईट उत्तन ते तारोडी, चौक या गावच प्रॉपर्टी टॅक्स एम.एम.आर.डी.ए. ला जाणार आहे. वसुल करून तिकडे पाठवणार. आपण त्यांच्याकडून वसुल करायचा खर्च घेतो.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, मालमत्ता कराच्या बाबतीत इतर करवाढी बाबतीत जे विषय स्थायी समितीपुढे आलेले आहे. मा. आयुक्त साहेबांना माझी अशी विनंती आहे. त्या पत्रकाराने. या शहराची दिशाभूल केलेली आहे. त्या पत्रकारांना बोलवून एक निवेदन द्या की, ही जी कर आकारणी आहे. ते प्रशासनाने प्रस्तावित केलेली आहे. ते फुल कन्स्ट्रक्शनसाठी आहे. पुढील कर आकारणीसाठी आहे. या पत्रकाराने दिशाभूल केलेली आहे. म्हणून लोकांमध्ये संभ्रमाच वातावरण निर्माण झालेल आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. महासभेच्या मंजूरी नंतरच. सविस्तर मी पत्रकार परिषद घेवून...

**अनिल सावंत :-**

आता प्रशासनाने जे प्रस्तावित केलेल आहे. पुढिल कर आकारणीसाठी आहे. एक्झीस्टींगसाठी नाही. हा मुद्दा जरा क्लिअर करा.

**मा. आयुक्त :-**

करवाढीच आता इलेक्ट्रिकच दर वाढले. एस.टी. चे दर वाढले ते दोन – तीन महिने राहतात. मा. सभापती साहेब, नगरपालिका असताना फक्त मिटिंगचा भत्ता होता. त्यानंतर नविन नगरपालिका झाली त्यावेळी ३ हजार रू. भत्ता झाला. नंतर ४ हजार रू. झाला. आत्ता ७.५० हजार रू. झाला.

**अनिल सावंत :-**

कमी करा.

**मा. आयुक्त :-**

गर्व्हरमेन्टला पण माहिती झाल की, महागाई आहे. नगरसेवक ३ हजार रू. मध्ये कस चालवणार. म्हणून ते ७.५० हजार रू. केल. आणि हा कर जो आहे. कर ९८ ला दर आकारणी झालेली आहे. ९८ पासून तुम्ही १० वर्षात काहीत बदल केला नाही.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, मी ठराव मांडतो नगरसेवकांना जी महागाई भत्ता वाढलेला आहे....

**शरद पाटील :-**

जेव्हा मानधन होत तेव्हा सुध्दा नगरसेवक तेवढेच होते. जेव्हा ३ हजार रू. होते तेव्हा पण नगसेवक तेवढेच आहे. ७.५० हजार रू. झाले. तेव्हा पण तेवढेच नगसेवक आहे. पण, आता या शहराची प्रॉपर्टी वाढली ना.

**अनिल सावंत :-**

त्यांचा सुध्दा तोच मुद्दा आहे.

**शरद पाटील :-**

त्यांनी आपल्याला मानधन नसल्यापासून सांगितल. मी पण सांगितल की आता पैसे पण वाढले.

**मा. आयुक्त :-**

तुमच्यापुढे सर्वांत महत्वाच बेसिक म्हणजे ६००-७०० रेट होता. सगळ्यांनी डोळ्यानी पाहिलेल आहे. फ्लॅटचा रेट ६००-७०० रू. चालू होता. ज्यावेळेला काशिमिरा रोड झाला. पाणी मिळायला लागल. त्यावेळेला फ्लॅटच्या किंमती वाढल्या. आणि २५०० ते ४००० बिल्डर चे लोक द्यायला लागले. आता त्या लोकांना फ्लान्ट खरेदी करायला पैसे आहे. आणि आमच कर भरायला पैसे नाही. हे तुम्ही सत्य कस पटवून जाणार.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, दरवाढीला फक्त विरोधी पक्षांचाच विरोध नाही. हे जे सत्ताधारी आहेत संयुक्त लोकशाही आघाडी, एन.सी.पी. त्यांचा सुध्दा विरोध आहे. आणि हा विषय शहरातील जे १२ लाख नागरिक आहेत त्यांच्याशीनिगडीत आहे. त्यामुळे ह्याच्यावर विचार विनीमय करण्यासाठी मा. महासभेपुढे ठेवावा. जिथे सर्व वॉर्डचे लोकप्रतिनिधी असतील. म्हणून आम्ही ठराव करतो. मालमत्ता कराची आकारणीसाठी कर योग्य मुल्य कर ठरवण्यासाठी भाडे मुल्याचे वाजवी दर ठरवण्याचा विषय शहरातील प्रत्येक नागरिकाशी निगडीत असल्यामुळे सदर विषय मा. महासभेपुढे ठेवण्यात यावा. तसेच प्रकरण क्र. ११९ ते १२८, १२५, व १३१ हे सर्व प्रस्ताव कर वाढीचे असल्यामुळे हे प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवण्यात यावे. असा मी ठराव मांडत आहे.

**जुबेर ईनामदार :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. आयुक्त :-**

त्यावर होणारी थोडीशी अडचण अशी आहे. की, तुम्ही होणाऱ्या नागरिकांच म्हणतात. आता तुमचे नागरिक नाही, नागरिक केव्हा होणार जेव्हा तुमच्या शहरा कडून फ्लॅट घेतल्यानंतर.

**जुबेर ईनामदार :-**

शहरामध्ये आल्यानंतर नागरिकच होतील ना.

**मा. आयुक्तः-**

येईल त्या वेळेला. आता नागरिकांवर काहीच बदल नाही.

**अनिल सावंत :-**

शहरात येणारे.

**मा. आयुक्त :-**

हो नविन. मग येणारे नागरिक कस होणार. नागरिक होणार नाहीत. नविन होणाऱ्या प्रॉपर्टीवर ही आकारणी आहे. आताच्या प्रॉपर्टीवर दरवाढ लागणार नाही. त्यामुळे आता तुम्ही तुमच हे कशाला करून घेता.

**मा. सभापती :-**

दरवाढीचे सगळे जे विषय आहे ते आपण मा. महासभेमध्ये पाठवतो. त्याला सर्वांची मंजूरी आहे ना.

**प्रविण पाटील :-**

आमची मंजूरी नाही. आमचा विरोध आहे.

**अनिल सावंत :-**

तुमचा विरोध म्हणजे काय? म्हणजे स्थायी समिती पुढे ....

**प्रविण पाटील :-**

हा विषयच फेटाळावा.

**अनिल सावंत :-**

कस काय?

**प्रविण पाटील :-**

करवाढीचा विषय, ठराव सध्या...

**मा. आयुक्त :-**

दोन्ही कुठल्याही योजना घेवू नये.

**प्रविण पाटील :-**

साहेब, तुम्ही संबंध डायरेक्ट करवाढी आणि योजनाचा लावता. जेव्हा बघाव तेव्हा योजना-योजना. ह्या योजना फक्त करवाढीमुळे होणार का?

**मा. आयुक्त :-**

तुम्ही महापालिकेचा अभ्यास करा. तेव्हा तुम्हाला कळेल.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य प्रविण पाटील दरवाढ हे मा. महासभेने मंजूरी द्यावीच लागते. आपण कसले निर्णय घेतले ते तुम्हाला मा. महासभेत द्यावच लागेल.

**मा. आयुक्त :-**

आज १० वर्षाने कर वाढतो.

**प्रविण पाटील :-**

आता करू नका. नंतर करा. सध्या तुम्ही आम्हाला काही सुविधा देत नाही.

**मा. सभापती :-**

तुमचा विरोध आहे का?

**मा. आयुक्त :-**

सुविधा काय म्हणजे मला त्या सांगा ना. सुविधा म्हणजे प्रत्येक घरात नेवून पोचवायच का?

**मा. सभापती :-**

मा. महासभेमध्ये आपला हा विषय जाणारच आहे. काही केल तरी. तर तुमचा त्याच्यासाठी विरोध आहे का?

**प्रविण पाटील :-**

जावू द्याना. इथे आणला ना तर इथे आमचा विरोध आहे.

**मा. आयुक्त :-**

सुविधा म्हणजे तुम्हाला कॅलक्युशन पण करून सांगितल.

**मा. सभापती :-**

इथे आणावच लागते. इथुन जी काही मंजूरी आहे ती घ्यावी लागते. नंतर मा. महासभेत जाते.

**प्रविण पाटील :-**

साहेब, आमचा या विषयाला विरोध आहे.

**मा. सभापती :-**

कशासाठी विरोध आहे.

**प्रविण पाटील :-**

करवाढीच्या विषयाला आमचा विरोध आहे.

**मा. सभापती :-**

इथे आपण कोणालाही दरवाढ दिलेली नाही. मग, कशाला विरोध आहे.

**प्रविण पाटील :-**

आमचा या विषयालाच विरोध आहे.

**मा. सभापती :-**

त्यांचा विरोध नोंदवणे. सन्मा.सदस्य मदन सिंगजी मा. महासभा मे विरोध आने दोना. तुमचा विरोध आहे ना. तो मा. महासभेमध्य नोंदवा.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहेब, माझी सुचना आहे. मागील काही वर्षात सर्व व्यवसायामध्ये असलेली मंदीची लाट व त्याच्यात सर्व व्यवसायीक व जन सामान्यवर झालेला प्रभाव तसेच वाढत्या महागाईमुळे लोकांना त्यांत दैनंदिन जीवन जगणे मुश्किल झालेल आहे. अशावेळी हा प्रस्ताव आणने योग्य नाही. महापालिका उत्पन्नात वाढ करण्यासाठी शासनाने हा विषय आणल्याचे सांगत आहे.

**याकुब कुरेशी :-**

सन्मा. सदस्य मदन सिंग जी. आप जो पढ रहे है वह जुने लोगो के लिए नही है। आज जो प्रस्ताव आया है।

**प्रविण पाटील :-**

सुचना मांडत आहे.

**याकुब कुरेशी :-**

सुचनाच चुकीची आहे. आपकी सुचना गलत है।

**अनिल सावंत :-**

आपकी सुचना दिशाभूल करनेवाली है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

परंतु, मागील काही वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल पाहता. लेखा परिक्षण विभागाने घेतलेल्या प्रशासनावरील आक्षेपांची पुर्तता अद्यापर्यंत केलेली नाही. प्रशासनाने उत्पन्न बुडवण्याचे आक्षेप अहवालात आहे. लेखा संहिता नियमाप्रमणे लेखा परिक्षकाच्या अहवालाप्रमाणे ९० दिवसात संबंधित आक्षेपावर मा. आयुक्त यांनी कारवाई करणे गरजेचे होते. पण, तसे न करता. महानगरपालिकेचे फार मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान अधिकारी वर्गाकडून करण्यात येत आहे. त्यांची जरी पुर्तता केली असती. तरी आज करामध्ये वाढ आणण्याचे प्रस्ताव समितीपुढे आणण्याची गरज पडली नसती. म्हणून प्रकरण क्र. १८, १९, १२०, १२१, १२४, १२५, १२९,१३०,१३१ ह्या प्रकरणाचा आमचा विरोध आहे.

**अनिल सावंत :-**

माझ्या ठरावामध्ये ही सुचना आहे तर ह्या सुचनेला माझा विरोध आहे. कारण ही पूर्ण सुचना...

**प्रविण पाटील :-**

सुचनेला कशाला विरोध आहे. तुम्ही सुचना द्यायला विरोध देता. तुमच तुम्ही मत मांडा.

**अनिता सावंत :-**

ठरावाच्या विरूध्द सुचना आहे ना. कशी ॲक्सेप्ट करावी.

**जुबेर ईनामदार :-**

तुम्ही ठरावाच्या बाजुने बोलत नाही. तुम्ही ठरावाच्या विरूध्द बोलतात.

**प्रविण पाटील :-**

आमच मत मांडा, सुचना मांडा...

**अनिल सावंत :-**

तुम्ही दिशाभूल करताय. सुचना मांडून दिशाभुल करतात.

**जुबेर ईनामदार :-**

हा विषयाला विषयांतर झाला ना. विषयच वेगळा झाला.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, ऑडीट शोकाची पूर्तता झाली तर उत्पन्न वाढवण्याची गरज पण नाही. तर हे सगळे उत्पन्न वाढीचे टोटल बेरिज मारू. आणि त्यांच ऑडीट शोकाची उत्तर एक महिन्या भरात देवू. त्यांनी तेवढी रक्कम जमवून द्यावी. ऑडीट शोकाची उत्तर देण म्हणजे अस वागत नव्हत. अस वागा हे सांगायच सजेशन. ह्यापुढे वागू म्हणू अस उत्तर द्यायच काय? सगळी अमाऊंट तिथे येणार आहे का?

**मदन उदितनारायण सिंह :-**

आपली जी वसुली राहिलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

अस नाही. वसुलीच म्हणजे मामुली अमाऊंट प्रत्येक नगरपालिकेत आणि महापालिकेत सगळीकडे होत असत. ते सजेशन आहेत. ती अमाऊंट म्हणजे कर वाढवण्याची गरज नागी. जर कोणाकडून येण राहिल असेल तर ती तेवढी रक्कम होत नाही. ती, किरकोळ मामुली रक्कम आहे. महापालिका कायद्याप्रमाणे चालत असताना. हे पाहिल नाही ते पाहिल नाही. आम्ही पाहिल होत हे आम्ही उत्तर देणार. मग, त्यांच समाधान झाल नाहीतर ते परत क्युरी काढणार. ते आम्हाला सेंन्ट्रल गर्व्हरमेन्टच्या ऑडीटरला उत्तर द्यायच आहे. त्यांनी पूर्तता बघायची आहे. पूतर्ता बघून झाल्यानंतर कर वाढीची जी रक्कम आहे. ती रक्कम ऑडीट शेकातुन बाहेर येणार आहे का? कस शक्य आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मदन सिंग जी अभी जो ठराव मांडा है। सन्मा. सदस्य सावंत जी ने तो उसमे आपकी सुचना कैसे आ सकती है?

**मदन उदितनारायण सिंह :-**

उनको ठराव मे नही अपनी सुचना अलग से देता हुँ।

**मा. सभापती :-**

इधर सब्जेट नही तो सुचना किसके बारे मे सुचना दे रहे है?

**मदन उदितनारायण सिंह :-**

तो हम यहा किसलिए आये?

**मा. सभापती :-**

मा. महासभे मे भेजना हे इसके लिए आपका क्या डिसीजन है।

**मा. आयुक्त :-**

या उलट कर लावले नाही. आणि वाढवले नाही.

**प्रविण पाटील :-**

हा विषय आणायलाच नाही पाहिजे. विरोध आहे तर मा. महासभमध्ये पाठवू नका. विषयच फेटाळून टाका ना.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य मदन सिंग साहेबांनी जे म्हंटलेल आहे ऑडीट शकची पुर्तता करा. याउलट केंद्र शासनाच्या ऑडिटरने सुचवल की, दर वाढवा आणि नविन कर लावा. अस म्हंटलेल आहे. ऑडीट म्हणजे गाईड लाईन्स तुम्ही ह्याची पुर्तता करायची. त्यांना पटल नाहीतर परत क्वेरी काढणार, काहींच्या कडून १० रू. कमी घेतले. काहींच्या कडून जास्त घेतले. हे ऑडीट शेकाच आहे. त्यामध्ये टोटल रिकवरी नसते.

**मदन उदितनारायण सिंह :-**

कुठेतरी आपण खर्च पण कमी केल पाहिजे ना.

**मा. आयुक्त :-**

समजा, एखाद्याने ७० टक्के वसुली केली असेल तर तुमचे ८० टक्के झाले नाही म्हणता. ते आपण पुढच्या वर्षी करून दाखवतो. ऑडीट शेकाच उत्तर म्हणजे महापालिकेला रक्कम मिळते अस नाही. ती समज चुकीची आहे. या उलट केंन्द्र शासनाच्या ऑडीटरने कर दर वाढवा म्हणून ३ पानाचा रिपोर्ट दिला आहे.

**सुधा व्यास :-**

मा. आयुक्त मुझे ऐसे लग रहा है की, यह जो सब्जेक्ट है वह वहॉपर ट्रान्सपर्ट हो रहा है। इसमे विरोध का तो कोई बात ही नही है। क्योंकी जब अपने पास सब्जेक्ट ही नही है। तो सिस्टेडिंक विटो पॉवर समजा जाता है वह जनरल असेंबली मे जा रहा है।

**मा. सभापती :-**

स्टॅण्डींग मे जो भी मंजूरी होती है उसकी मा. महासभा मे भी मंजूरी लेनी होती है।

**प्रविण पाटील :-**

साहेब, ठिक आहे. पण, आमचा विरोध आहे. एवढ तुम्ही लिहून घ्या.

**सुधा व्यास :-**

वह मेज्युरिटी के हिसाब से हो जायेगा।

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मदन सिंग जी आपने अभी जो ठराव पढके दिया वह आप वापस ले रहे है ना।

**मदन उदितनारायण सिंह :-**

सुचना लोना।

**मा. सभापती :-**

सुचना क्या है बोलो ना।

**मदन उदितनारायण सिंह :-**

जो अभी दिया।

**मा. सभापती :-**

वह सुचना कैसे आयेगी। सब्जेक्ट कौनसा है?

**दादासाहेब पाटील :-**

ए.जी.ऑडीट ने जे ऑब्जेक्शन घेतलेल आहे. दि. १४/०१/२०१० रोजी तर ते खालील प्रमाणे आहे. The scrutinue of record in respect pf taxes in owes related that the following taxes where not started recovering so …. Even after 8 year from the date of formation of the corporation त्याच सिरियन नं. १ tax च नाव आहे . Tax on vechical, boats and animals. Nature at taxes percentage wise त्याच्यानंतर २ नंबर वर आहे. tax on dogs. Percentage wise म्हणजे BPMC act 1949 दिले आहे त्याच्यानुसार. त्याच्यानंतर Theater percentage wise toll and cehical animal entering the city percentage wise. Water tax percentage wise. Conservation tax at coverage tax Percentage wise, additional ,conservation tax of shives tax Percentage wise. Street tax Percentage wise. Water benefit tax percentage wise, shiveres benefit tax percentage wise. हे जे B.P.M.C. act 127 चा कलम आहे. A.B. 29, हे २-४ कलम आहे. त्यानुसार वाढवायचे आहे.

**शरद पाटील :-**

हे कसले-कसले टॅक्स आहे?

**दादासाहेब पाटील :-**

हे आपण त्या कलमानुसार लावलेच नाही. महापालिका चालू झाल्यापासून लावलेले नाही. असा त्यांना आक्षेप आहे.

**मा. आयुक्त :-**

म्हणजे १२७ प्रमाणे पाणी लाभकर, साफसफाई कर, अंडर ग्राऊंड ड्रेनेज कर हा लावला नाही? महापालिका स्थापन होवून ८ वर्ष झाली.

**शरद पाटील :-**

टोल टॅक्स आपण कुठे लावणार?

**दादासाहेब पाटील :-**

लावला होता ना.

**मा. आयुक्त :-**

लाभकर, पाणी पुरवठा लाभकर. म्हणजे पुढे येणाऱ्या योजनेच लाभकर आतापासून लावायच.

**दादासाहेब पाटील :-**

आता जो अजेंडा आहे. त्यावर हे विषय आहे. त्याच्यानुसार मागच्यावेळी सदस्यांनी विषय उपस्थित केला होता की, आपण अतिक्रमणाचे पैसे घेतले नाही. त्याच्यावर ए.जी. ने अस ऑब्जेक्शन घेतलेल आहे. आणि त्या नुसार अतिक्रमण पाडायला गेल्यानंतर त्याच्याकडून वसुली करायची आहे. त्याच्यामध्ये फार पैसे मिलतील अस मा. सभा सदस्यांच म्हणन होते. ए.जे. ने त्याच्यावर १९००-२००० पासुन ऑब्जेक्शन आजपर्यंत घेतलेल आहे. त्याच्यामध्ये जी वसुली दाखवली ती फक्त ८२ लाख रू. आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आपण वसुली केली नाही ना.

**दादासाहेब पाटील :-**

मोठी रक्कम नाही. फक्त ८२ लाख रू. ५-६ वर्षापर्यंतची दाखवली आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आपण परवान्याच सुचवल होत. परवानामधुन कमीत कमी १० कोटीं रू. येतील. हे लोक ऐकायलाच तयार नाही.

**मा. आयुक्त :-**

सेसमध्ये नोंदवलेले १२ हजार आहे. आता स्थानिक करामध्ये अस आलेल आहे ५ लाखाच्या आतल धरायचच नाही. ५ लाखाच्या वरच स्थानिक करामध्ये धरायच. आणि आता जे तुम्ही म्हणता. मालमत्ता करामध्ये कोणत्या कराचा समावेश होतो ते कोणत्या दराने बसवणे योग्य असतील. कलम १२७ पोटकलम १ प्रोव्हिजनासाठी मालमत्ता करामध्ये जे कर यापुढे दिलेले अपवाद वगळता मर्यादीच्या व शर्तेच्या अधिन राहून. शहरातील इमारती, जमीनीवर बसवण्यात येतील अशा पुढील कराचा समावेश होतो. शहराला पाणी पुरवठा करण्याची तरतुद करण्यासाठी महापालिकेस वाजवी वाटेल असा त्यांच्या कर योग्य मुल्याच्या टक्केवारीने पाणीपट्टी वाढवा. पाणी पुरवठेच्या सुविधा पुरविण्यासाठी आणि त्यात सुधारणा करण्यासाठी. म्हणजे आता चालू आहे. त्याच पण वाढवायच. आणि पुढे योजना येणार आहे. त्यासाठी पण आतापासून सुरू करा.

**मदन उदितनारायण सिंह :-**

दोन तर घ्यायचे.

**मा. आयुक्त :-**

आम्ही त्यातच ॲड केले ना. आता अंडर ग्राऊंड ड्रेनेज अजुन आपल्या गावात नाही. पण अंडर ग्राऊंड ड्रेनेज खोदाई सुरू झालीय अंडर ग्राऊंड च जे लोन घेतलेल आहे.ते रि-पेमेन्ट आणि ते चालवण्याच करतात.

**मदन उदितनारायण सिंह :-**

खोदाई कुठे सुरू झाली?

**मा. आयुक्त :-**

सुरू झाली.

**दिपक खांबीत :-**

क्विन्स पार्क ला चालू झालेली आहे.

**याकुब कुरेशी :-**

ती योजना फक्त तिकडेच आहे का?

**मा. आयुक्त :-**

नाही. ९ ठिकाणी प्लान्ट आहे.

**याकुब कुरेसी :-**

मग, एकच ठिकाणी चालू झाल ते.

**मा. आयुक्त :-**

आणि त्यानंतर सगळे सेप्टिक्ट टँक बंद होतील. प्रत्येक टॉवर च अंडर ग्राऊंड ड्रेनेजला डायरेक्ट कनेक्टेड होईल. आणि फिल्टर केलेल जे पाणी आहे. रि-सायकलींग केलेल पाणी गार्डन आणि इतर कामासाठी वापरता येईल. अशा तऱ्हेने ती योजना ९ ठिकाणी तुम्हीच मंजूर केलेली आहे.

**अनिल सावंत :-**

शहराच्या ह्याच्यामध्ये आम्हीच केलेल आहे.

**मा. आयुक्त :-**

पाणी पुरवठा लाभकर, नंतर साफसफाई कर, इतर ठिकाणी १२ टक्के आहे. साफसफाई कर. पाणी पुरवठा लाभकर इतर ठिकाणी १३ टक्के आहे. नंतर अंडर ग्राऊंड ड्रेनेज लाभकर, मलःप्रवाह सुविधा लाभकर. ह्याच पुण्याला २२ टक्के आहे. म्हणजे अंडर ग्राऊंड आता सुरू झालेल आहे. ठाण्याला पण आता सेन्ट्रंल गर्व्हरमेन्ट कडून सुरू झालेल आहे. आणि यापूर्वी पासून त्यांच टॅक्स चालू आहे. अंडर ग्राऊंड नसताना म्हणजे अंडर ग्राऊंड काम सुरू झाल. की, त्याच कॅपीटल इनवेस्टमेंट जे आहे ते थोड-थोड करून लोन रि-पेमेन्ट करायला कॅपीटल इनवेस्टमेंट रि-पेमेन्ट करायला ते युझ करायच आहे. आता पाण्याची योजना आता स्टेट गर्व्हरमेन्टनी मंजुरी दिली ते एम.एम.आर.डी.ए. कडे पडलेल आहे. ती योजना सेंट्रल कडे मंजुरीसाठी जाणार. त्यावेळी आम्हाला विचारणार. तुम्ही योजना घेणार. तर ५० टक्के कशातुन घालणार? तर लोकांना योजना मिळणार आहे. म्हणुन आतापासून लाभकर सुरू करायच आहे. एकाच वळेला जर लावल तर योजना होणार नाही. कारण, प्रत्येकांच्या वाटेला प्रत्येक प्रॉपर्टी टॅक्स मध्ये एक-एक, दोन-दोन लाख रू. होईल. म्हणून थोड थोड गोळा करून त्यांना रि-पेमेन्ट करायच.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

उत्पन्न बघून योजना करा.

**मा. आयुक्त :-**

उत्पन्न दाखवल्याशिवाय योजनाच मंजूर होणार नाही.

**प्रविण पाटील :-**

साहेब, आमचा या विषयाला विरोध आहे.

**मा. आयुक्त :-**

ॲक्ट मधल कलम आहे. १२७, १२८, १२९ वाचून घ्या.

**प्रविण पाटील :-**

ठराव मागे घेतला विरोध घ्या. विषयाला विरोध आहे. ठरावाला नाही.

**मा. सभापती :-**

विषयाला विरोध फक्त तुमचा आहे की .

**प्रविण पाटील :-**

आमच्या तिघांचा आहे. करवाढीच्या विषयाला.

**अनिल सावंत :-**

विषयाला विरोध म्हणजे काय?

**मा. सभापती :-**

विकासासाठी पण विरोध आहे का?

**प्रविण पाटील :-**

साहेब, विकासासाठी आमचा विरोध नाही.विकास पाहिजे. पण विकासासाठी हा करवाढी हा एकच मार्ग नाही.

**मा. आयुक्त :-**

पैसे नाही तर विकास पण नाही.

**प्रविण पाटील :-**

तुम्ही फक्त करवाढी आणि विकास यांचा संबध जुळवता. करवाढी मुळे फक्त विकास होत नाही. इतरही मार्ग आहेत.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य प्रविण पाटील यांचा विरोध नोंदवून.

**अनिल सावंत :-**

विरोध कशाला? विषयपत्रिकेला त्यांचा विरोध आहे..

**प्रविण पाटील :-**

अस सांगा की, या विषयामुळेच फक्त मिरा भाईंदरचा विकास होतो.

**मा. सभापती :-**

नाहीतर कसा होईल ते सांगा ना.

**मा. आयुक्त :-**

कर न वाढवता विकास कसा करणार हे सांगितल तर तुम्ही पण पाठीमागे घ्याना.

**प्रविण पाटील :-**

फक्त सांगा ना की, कर वाढीमुळे विकास होतो.

**मा. आयुक्त :-**

कर वाढ न करता विकास कसा करायच ते तुम्ही समजावून सांगा आणि सगळ्या कौन्सीलर तुमचा बाजूने करा ना. तुम्ही निवडून आलेल्या तुम्हाला सर्व सभासदांच मत परिवर्तन करण्याच तुम्ही भाषण कराना. कर न वाढवता विकास कसा होवू शकतो. यांच्या मेमरीमध्ये बदल करा. मग, तुम्ही....

**प्रविण पाटील :-**

त्यांच्या मेमरीमध्ये ते सक्षम आहेत. मला जे वाटतात ते मी बोललो.

**मा. आयुक्त :-**

तोंडाने बोलून कर न वाढवता देखील विकास करता येतो हे तुम्ही सिध्द करा. एखादा काऊन्सलर. एखादा सभासद कर न वाढवता विकास कसा करू शकतो हे जर सिध्द केल तर हे तुमच्या पाठीशी सगळे येतील ना.

**प्रविण पाटील :-**

फक्त कर वाढवन हा एक विकासाचा मार्ग नाही आणि ही वेळ पण नाही.

**मा. आयुक्त :-**

कर कसा वाढवता विकास कसा करायचा ह्या बद्दल दोन तास आरग्युमेन्ट कराना.

**प्रविण पाटील :-**

मी फक्त कराच बोलतो.

**मा. आयुक्त :-**

कर न वाढवता विकास कसा करायचा त्यासाठी तुम्ही आरग्युमेन्ट कराना.

**प्रविण पाटील :-**

आपल्या महानगरपालिकेमध्ये विकासासाठी आणखीन दुसरे मार्ग सुध्दा आहे.

**मा. आयुक्त :-**

सांगा ना. नुसत मार्ग आहेत हे शब्द बोलून चालणार नाही. विकासाच कर न वाढवता कस करता येईल याच सविस्तर विवेचन करा. सगळे काऊन्सेलर तुमच्या बाजूने होतील.

**प्रविण पाटील :-**

सविस्तर सांगातो, त्यावर सगळा अभ्यास करून तुम्हाला सविस्तर सांगतो.

**मा. आयुक्त :-**

कर न वाढवता विकास कसा हाईल. ह्याची सविस्तर माहिती सांगा.

**प्रविण पाटील :-**

साहेब, सांगतो तुम्हाला. पण, आता आणली नाही.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे सांगा.

**प्रविण पाटील :-**

आता नाही आणली. नंतर सविस्तर सांगतो.

**नगरसचिव :-**

मालमत्ता कराची आकारणीसाठी कर योग्य मुल्य ठरविण्यासाठी भाडे मुल्याचे वाजवी दर ठरविण्याचा विषय पुढील कर आकरणीशी निगडीत असल्यामुळे सदर विषय महासभेपुढे ठेवण्यात यावा. तसेच प्रकरण क्र. ११९ ते १२२, १२४, १२५ व १२९ ते १३१ हे प्रस्ताव करवाढीचे असल्याने हे सर्व प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवण्यात यावेत.

**मा. सभापती :-**

सदर ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**मा. आयुक्त :-**

३ कर नविन पाणी लाभकर मलःनिसरण कर, आणि साफसफाई कर. आणि रस्ता कर. एवढ तरी वितार करायला पाहिजे होत की खड्डा पडला की, महापालिकेला शिव्या देतात.

**प्रविण पाटील :-**

साहेब, जावू द्या. माझ्याकडे, महिने झाले. वर्ष झाले खड्डे पडलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

महापालिकेला केलेल कोण बोलत नाही. चांगलं काय केल ते कोणी बोलत नाही. चांगल काही नाही केल त्याच्यावर चर्चा चालू असते.

**प्रकरण क्र. ११८ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम ७ नुसार मालमत्ता कराचे आकारणीसाठी करयोग्य मुल्य ठरविण्यासाठी भाडेमुल्याचे वाजवी दरास मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ९८ :-**

मालमत्ता कराची आकारणीसाठी कर योग्य मुल्य ठरविण्यासाठी भाडे मुल्याचे वाजवी दर ठरविण्याचा विषय पुढील कर आकरणीशी निगडीत असल्यामुळे सदर विषय महासभेपुढे ठेवण्यात यावा. तसेच प्रकरण क्र. ११९ ते १२२, १२४, १२५ व १२९ ते १३१ हे प्रस्ताव करवाढीचे असल्याने हे सर्व प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवण्यात यावेत.

**सुचक :- श्री. अनिल दिवाकर सावंत** **अनुमोदक :- श्रीम. ग्रिटा फॅरो**

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२३, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये सुधारणा करुन नंतर समाविष्ट केलेल्या कलम १४०ब नुसार परिस्थितीकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची (पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था, कृमी मिश्र खत, सौर उर्जेचा वापर आणि इतर अपारंपारिक उर्जा स्त्रोत, सांडपाण्याचे पुनश्चःचक्र आणि पुर्नवापर) अंमलबजावणी करण्याकरीता मालमत्ता करातून सूट किंवा परतावा देणेस मंजूरी मिळणेबाबत.

**मा. आयुक्त :-**

त्याच्यामध्ये एक ॲड करायचे आहे. कचऱ्याची विल्हेवाट त्यांच्या कंपाउंडमध्ये करण्यात येईल. असे ॲड करायचे आहे. हे तुमच्या नगरसेविकेने प्रस्ताव आमच्याकडे दिलेला आहे की, आमचा कचरा आम्ही विल्हेवाट करु. तुमच्याकडे देणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, कसे पॉसिबल आहे?

**मा. आयुक्त :-**

पॉसिबल आहे.

**शरद पाटील :-**

त्यांना जागा कोण देणार?

**मा. आयुक्त :-**

सोसायटीने ते खत बनवून गार्डनला देणार आहे. ज्यांच्या ज्यांच्या कचऱ्याची त्यांनी त्यांनी व्यवस्था करावी.

**जुबेर इनामदार :-**

माझी सुचना अशी आहे की, ते ५ टक्के वरुन १० टक्के वर घेवून जावा.

**मा. आयुक्त :-**

नाही.

**अनिल सावंत :-**

महानगरपालिका क्षेत्रातील ज्या इमारतीच्या बाबतीत पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था, कृमी मिश्र खत, सौर उर्जेचा वापर आणि इतर परंपारिक उर्जास्त्रोत, सांडण्याचे पुनश्चःचक्रण आणि पुर्नवापर किंवा पर्यावरणनुकुल आणि परिस्थितीकीय लाभदायक गृहनिर्माण संस्था यांना चालना देणारी किंवा महानगरपालिका

किंवा राज्य शासन यांनी निश्चित केलेली या सारख्या कोणत्याही योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असेल अशा इमारतीच्या बाबतीत मालमत्ता करातून सुट किंवा परतावा देण्याबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात सुधारणा करुन पुढील प्रमाणे कलम समाविष्ट केलेले आहे.

**कलम १४०ब.** या अधिनियमात काहीही अंतर्भुत असले तरी या कलमाच्या प्रयोजनार्थ राज्य शासन किंवा महानगरपालिका ठरवून देईल अशी परिस्थितीकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असेल अशा जमिनीच्या आणि इमारतींच्या बाबतीत महानगरपालिका, सर्वसाधारण या विशेष आदेशाद्वारे, निर्धारीत करील अशा दराने मालमत्ता कर भरण्यातून सुट किंवा परतावा देईल आणि परिस्थितीकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता आणि ती चालु ठेवण्याकरीता उपाययोजनांची मर्यादा लक्षात घेउन, सुट किंवा परतावा देण्याचे वेगवेगळे दर निर्धारीत करता येतील.

उपरोक्त तरतुद करुन सदरचा अधिनियम १४ जानेवारी २००९ च्या राजपत्रात प्रसिध्द केलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये नव्याने निर्माण होणाऱ्या व अस्तित्वात असलेल्या गृह संकुलनामध्ये पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था (रेन वॉटर हार्वेस्टिंग) सौर उर्जेचा वापर (सोलर वॉटर हिटर) सांडपाण्याचे पुनश्चःचक्रण आणि वापर (सिवरेज ट्रीटमेंट प्लांट) आदी योजनांची अंमलबजावणी केली जात आहे.

वरील प्रमाणे योजनांची अंमलबजावणी ही पर्यावरणानुकुल असल्याने पर्यावरणाचे तसेच मुलभुत सुविधा स्त्रोतांचे रक्षण होण्यास मदत होत आहे. अशा योजनांच्या अंमलबजावणीसाठी मोठ्या प्रमाणात भांडवली खर्च तसेच त्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी गृहनिर्माण संस्थांना खर्च करावा लागत असतो. पर्यावरणनुकुल व परिस्थितीकीय लाभदायक गृहनिर्माणास योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी होणारा खर्च पाहता अशा गृहनिर्माण वा सोसायट्यांना मालमत्ता करात सुट किंवा परतावा देणे संयुक्तीक आहे.

तसेच अशा वेगवेगळ्या योजनांसाठी वेगवेगळ्या दराने सुट किंवा परतावा देण्याची तरतुद उक्त कलमामध्ये करण्यात आलेली आहे. तरी खालीलप्रमाणे सुट देण्यांसाठी दर निश्चित करणे योग्य होईल.

| अ.क्र. | योजना | मालमत्ता करात सुट देण्याचा प्रस्तावित दर |
|---|---|---|
| १ | पावसाचे पाणी साठविण्यासाठी व्यवस्था (रेन वॉटर हार्वेस्टिंग) | ५ % |
| २ | सौर उर्जेचा वापर आणि इतर पारंपारिक उर्जास्त्रोत (सोलर वॉटर हिटर) | ५ % |
| ३ | सांडपाण्याचे पुनश्चःचक्रण आणि पुर्नवापर (सिवरेज ट्रीटमेंट प्लांट) | ५ % |
| ४ | गृहनिर्माण सोसायटी व लेआउटमध्ये ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणे | ५ % |

तसेच मालमत्ता करात सुट देण्यासाठी खालील निकषही ठरविणे आवश्यक आहे.

१) मालमत्ता करात सुट मिळविणेसाठी प्रतिवर्षी १ एप्रिल ते १५ एप्रिल या दरम्यान संबंधित गृहनिर्माण सोसायटीने महानगरपालिकेकडे अर्ज करावा लागेल.

२) अर्जासोबत उक्त योजनांची अंमलबजावणी करुन त्या चालु असल्याबाबत महानगरपालिकेच्या संबंधित विभागाचे (पाणी पुरवठा / सार्व. बांधकाम / आरोग्य / प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

३) सदर सुट ही समान्य करावर दिली जाईल.

तरी वरील निकषांवर उक्त लाभदायक योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या मालमत्तांना करामध्ये सुट देणेस ही सभा मान्यता देत आहे.

वरील प्रमाणे सुट देणेबाबत मा. महासभेच्या मान्यतेस ही सभा शिफारस करीत आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. आयुक्त :-**

साहेब, वर्षभर चालु राहिल्यानंतर सुट द्या. वर्षभर चालु राहिल.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. १२३ हे सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**शरद पाटील :-**

सौर उर्जेला खर्च किती येईल?

**सुधीर राउत (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सौरउर्जेला २५० लीटर देत असेल तर ४५ हजार रु. खर्च होतो.

**शरद पाटील :-**

त्याच्यावर मेन्टेनन्सचा खर्च काय होईल?

**प्रविण पाटील :-**

साहेब, याच्यामध्ये आपण तीन दिलेले आहे. एक सौरउर्जा दिलेले आहे, मिश्र खत दिलेले आहे आणि मी एकच सौरउर्जा केली किंवा मिश्र खत त्यांना करता नाही आले तर त्यांच्यासाठी काय? ३ पैकी एकच किंवा २ केले.

**मा. आयुक्त :-**

तिन्ही केले तर १५ टक्के चार्ज ठेवलेले आहे.

**प्रविण पाटील :-**

म्हणजे प्रत्येकी ५ टक्के आहे.

**मा. आयुक्त :-**

हो प्रत्येकी ५ टक्के आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, त्याची माहिती द्या.

**प्रकरण क्र. १२३ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये सुधारणा करुन नंतर समाविष्ट केलेल्या कलम १४०ब नुसार परिस्थितीकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची (पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था, कृमी मिश्र खत, सौर उर्जेचा वापर आणि इतर अपारंपारिक उर्जा स्त्रोत, सांडपाण्याचे पुनश्चःचक्र आणि पुर्नवापर) अंमलबजावणी करण्याकरीता मालमत्ता करातून सूट किंवा परतावा देणेस मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ९९ :-**

महानगरपालिका क्षेत्रातील ज्या इमारतीच्या बाबतीत पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था, कृमी मिश्र खत, सौर उर्जेचा वापर आणि इतर परंपारिक उर्जास्त्रोत, सांडण्याचे पुनश्चःचक्रण आणि पुर्नवापर किंवा पर्यावरणनुकुल आणि परिस्थितीकीय लाभदायक गृहनिर्माण संस्था यांना चालना देणारी किंवा महानगरपालिका किंवा राज्य शासन यांनी निश्चित केलेली या सारख्या कोणत्याही योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असेल अशा इमारतीच्या बाबतीत मालमत्ता करातून सुट किंवा परतावा देण्याबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात सुधारणा करुन पुढील प्रमाणे कलम समाविष्ट केलेले आहे.

**<u>कलम १४०ब.</u>** या अधिनियमात काहीही अंतर्भुत असले तरी या कलमाच्या प्रयोजनार्थ राज्य शासन किंवा महानगरपालिका ठरवून देईल अशी परिस्थितीकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असेल अशा जमिनीच्या आणि इमारतींच्या बाबतीत महानगरपालिका, सर्वसाधारण या विशेष आदेशाद्वारे, निर्धारीत करील अशा दराने मालमत्ता कर भरण्यातून सुट किंवा परतावा देईल आणि परिस्थितीकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता आणि ती चालु ठेवण्याकरीता उपाययोजनांची मर्यादा लक्षात घेउन, सुट किंवा परतावा देण्याचे वेगवेगळे दर निर्धारीत करता येतील.

उपरोक्त तरतुद करुन सदरचा अधिनियम १४ जानेवारी २००९ च्या राजपत्रात प्रसिध्द केलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये नव्याने निर्माण होणाऱ्या व अस्तित्वात असलेल्या गृह संकुलनामध्ये पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था (रेन वॉटर हार्वेस्टिंग) सौर उर्जेचा वापर (सोलर वॉटर हिटर) सांडपाण्याचे पुनश्चःचक्रण आणि वापर (सिवरेज ट्रीटमेंट प्लांट) आदी योजनांची अंमलबजावणी केली जात आहे.

वरील प्रमाणे योजनांची अंमलबजावणी ही पर्यावरणानुकुल असल्याने पर्यावरणाचे तसेच मुलभुत सुविधा स्त्रोतांचे रक्षण होण्यास मदत होत आहे. अशा योजनांच्या अंमलबजावणीसाठी मोठ्या प्रमाणात भांडवली खर्च तसेच त्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी गृहनिर्माण संस्थांना खर्च करावा लागत असतो. पर्यावरणनुकुल व परिस्थितीकीय लाभदायक गृहनिर्माणास योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी होणारा खर्च पाहता अशा गृहनिर्माण वा सोसायट्यांना मालमत्ता करात सुट किंवा परतावा देणे संयुक्तीक आहे.

तसेच अशा वेगवेगळ्या योजनांसाठी वेगवेगळ्या दराने सुट किंवा परतावा देण्याची तरतुद उक्त कलमामध्ये करण्यात आलेली आहे. तरी खालीलप्रमाणे सुट देण्यांसाठी दर निश्चित करणे योग्य होईल.

| अ.क्र. | योजना | मालमत्ता करात सुट देण्याचा प्रस्तावित दर |
|---|---|---|
| १ | पावसाचे पाणी साठविण्यासाठी व्यवस्था (रेन वॉटर हार्वेस्टिंग) | ५ % |
| २ | सौर उर्जेचा वापर आणि इतर पारंपारिक उर्जास्त्रोत (सोलर वॉटर हिटर) | ५ % |
| ३ | सांडपाण्याचे पुनश्चःचक्रण आणि पुर्नवापर (सिवरेज ट्रीटमेंट प्लांट) | ५ % |
| ४ | गृहनिर्माण सोसायटी व लेआउटमध्ये ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणे | ५ % |

तसेच मालमत्ता करात सुट देण्यासाठी खालील निकषही ठरविणे आवश्यक आहे.

४) मालमत्ता करात सुट मिळविणेसाठी प्रतिवर्षी १ एप्रिल ते १५ एप्रिल या दरम्यान संबंधित गृहनिर्माण सोसायटीने महानगरपालिकेकडे अर्ज करावा लागेल.
५) अर्जासोबत उक्त योजनांची अंमलबजावणी करुन त्या चालु असल्याबाबत महानगरपालिकेच्या संबंधित विभागाचे (पाणी पुरवठा / सार्व. बांधकाम / आरोग्य / प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.
६) सदर सुट ही समान्य करावर दिली जाईल.

तरी वरील निकषांवर उक्त लाभदायक योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या मालमत्तांना करामध्ये सुट देणेस ही सभा मान्यता देत आहे.

वरील प्रमाणे सुट देणेबाबत मा. महासभेच्या मान्यतेस ही सभा शिफारस करीत आहे.

**सुचक :- श्री. अनिल दिवाकर सावंत** **अनुमोदक :- श्रीम. ग्रिटा फॅरो**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२७, मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन दलाकरीता दोन मोठे टाटा १६१३/४८ चेसिसवर फायर टेंडर बॉडी बांधणेबाबत.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

प्रकरण क्र. १२७ च्या गोषवाऱ्यानुसार मे. देवी फायर सर्व्हिसेस ह्यांचे दर सर्वात कमी आहेत. तेव्हा प्रती वॉटर टेंडर रु. २६,४०,०००/- ह्याप्रमाणे २ वॉटर टेंडर बांधणेकामी व त्या वाहनासोबत अतिरिक्त साहित्य पुरवठा करणेकामी रु. ११,२७,७३५/- ह्या दराने २ नग वॉटर टेंडर बॉडी बांधून व अतिरिक्त साहित्यासह ४ महिन्याच्या मुदतीत पुरविणेकामी तसेच सदरचे काम मुदतीत पार न पाडल्यास नियमाप्रमाणे विलंब शुल्क प्रतिदिन रु. ५०००/- आकारण्यात यावे अशा सुचनेसह कमी दराच्या मे. देवी फायर सर्व्हिसेस ह्यांच्या निविदेस मंजूरी देत आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

इस ठराव को मेरा अनुमोदन है।

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, आता आपण ही वस्तु महापालिकेला आणुन देतो. माझी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना अशी विनंती आहे की, आपण ही जी वस्तु आणतो त्याचा निट वापर करा. आणि ह्याचा या शहराला उपयोग होईल असा वापर करून ती खराब होवू नये. त्याची जरा दक्षता घ्या.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वांनुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १२७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन दलाकरीता दोन मोठे टाटा १६१३/४८ चेसिसवर फायर टेंडर बॉडी बांधणेबाबत.

**ठराव क्र. १०० :-**

प्रकरण क्र. १२७ च्या गोषवाऱ्यानुसार मे. देवी फायर सर्व्हिसेस ह्यांचे दर सर्वात कमी आहेत. तेव्हा प्रती वॉटर टेंडर रु. २६,४०,०००/- ह्याप्रमाणे २ वॉटर टेंडर बांधणेकामी व त्या वाहनासोबत अतिरिक्त साहित्य पुरवठा करणेकामी रु. ११,२७,७३५/- ह्या दराने २ नग वॉटर टेंडर बॉडी बांधून व अतिरिक्त साहित्यासह ४ महिन्याच्या मुदतीत पुरविणेकामी तसेच सदरचे काम मुदतीत पार न पाडल्यास नियमाप्रमाणे विलंब शुल्क प्रतिदिन रु. ५०००/- आकारण्यात यावे अशा सुचनेसह कमी दराच्या मे. देवी फायर सर्व्हिसेस ह्यांच्या निविदेस मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत म्हात्रे** **अनुमोदक :- श्री. चंद्रकांत मोदी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२८, कापडी फलक, बॅनर्स, कटाउट, होर्डीग्ज व कमानीच्या जाहिरात फी दरामध्ये वाढ करणेबाबत.

**प्रविण पाटील :-**

साहेब, मला ह्याच्याबद्दल बोलायचं आहे. आपल्या शहरामध्ये कापडी फलक वगैरे जे लावली जातात त्याच्या सगळ्यांची परवानगी घेतली का?

**मा. आयुक्त :-**

जे परवानगी घेत नाही ते काढून टाकतो.

**प्रविण पाटील :-**

साहेब नाही काढत. जसे पहिजे तसे होत नाही.

**मा. आयुक्त :-**

रोजच्या रोज काढतो.

**शरद पाटील :-**

साहेब, आता मी विचारतो. आम्ही रेग्युलर काढतो असे सांगतो. ज्याचे परमिशन घेतले आणि त्याचे परमिशन संपल नाही. असे सगळे बॅनर काढलेले आहे असे तुम्हाला असे वाटते का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

एखादे राहिले असेल.

**शरद पाटील :-**

एखादे राहिल ठिक आहे पण असे किती तरी आहेत. आम्ही एक बघितले, ज्यांचे नविन लागते तो कधी तरी लावतो त्यांचे बरोबर वेळेवर काढले जातात.

**मा. आयुक्त :-**

हे म्हणून चूकीचे आहे.

**शरद पाटील :-**

मी तुम्हाला प्रुफ देतो. पैसे संपले बरोबर, तारीख संपली की काढा.

**मा. आयुक्त :-**

तेच तुम्हाला समजावून सांगतो. जे परवानगी घेतात ती परवानगी घेतल्याची तारीख आणि बोर्ड काढायची तारीख त्यांच्याकडून लिहायला लावतो आणि जी तारीख संपलेली आहे ती त्या बोर्डावर लिहीलेली असते. मग ते काढतो आणि नविन परवानगी न घेता लावलेली आहे. आता यापुढे परवानी न घेता लावलेले बोर्ड काढा आणि फौजदारी गुन्हा दाखल करा. म्हणजे यांना संख्या देता येईल ना. परवानगी न घेतल्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला. मग, फौजदारी गुन्हा दाखल करु नका असे कोण सांगायला आले तर ऐकू नका.

**शरद पाटील :-**

त्यांची वेळ संपल्यावर आपण काढू ना.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

नगरसेवकांनी काही वेळा लाकडी चौकडीमध्ये बॅनर लावलेले असतात. तर काही वेळेला लाकडी तुटतात, म्हणून लोखंडी फ्रेम बनवतात आणि त्याच्यामध्ये लावतात. तर हे कर्मचारी काय करतात की लोखंडी फ्रेम आहेत ना ते काढून घेउन जातात नंतर त्याचा बॅनर फाडून टाकतात आणि फ्रेम लोखंडी भावाने विकून टाकतात. असे किती तरी केसेस आहेत त्याचे परमिशन घेउन लावलेले असताना देखील ते तोडून काढून नेतात.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य पाटील साहेब हे तुम्ही म्हंटले ते बरोबर आहे. पण काढल्यानंतर किती शिव्या खाल्ल्या ते तरी विचारा.

**शरद पाटील :-**

तुम्ही शिव्या का खावून येता.

**मा. आयुक्त :-**

आम्ही घेत नाही म्हणून तर तुम्हाला सांगतो आम्ही त्याचे ह्याच्यामध्ये त्याच्यापेक्षा जास्त उत्तर देतो. १० माणसं सगळीकडे बघणार नाही. बोर्ड काढण्यासाठी १० माणसं ७९ कि.मी. मध्ये आहेत. फिरुन बघताना तपासून बघून काढायला उशिर होणार ना.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, ह्याच्यामध्ये राजकिय, सामाजिक तसेच धार्मिक जाहिराती करिता जाहिराती दरामध्ये २० टक्के कापले जातात. तर राजकीयमध्ये कशाला? राजकीय काढून टाका. कशाला प्रस्तावित करता?

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहेब, सामाजिक आणि धार्मिक आहे त्यांना ५० टक्के कमी करण्यात यावा.

**मा. आयुक्त :-**

जन्म तारखेचे बोर्ड कशामध्ये धरायचे.

**जुबेर इनामदार :-**

राजकीय झाला.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहेब त्याच्या बरोबर हे पण सांगता की, सामाजिक आणि धार्मिकचे ५० टक्के सुट.

**अनिल सावंत :-**

कशाला? ते पण ॲडव्हरटाईजमेंट करतात. काही सुट द्यायची गरज नाही.

**मा. आयुक्त :-**

कशालाही सुट नाही द्यायची.

**मदन उदितनारायण सिंह :-**

जो पैसे नही देते उनका कायम लगा रहता है।

**अनिल सावंत :-**

त्याच्यात तुमचे जास्त असतात.

**मा. आयुक्त :-**

बॅनर कार्यकर्ते लावतात खर्च तुमचा होतच नाही.

**जुबेर इनामदार :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४, २४५, ३८६ आणि ३९२ अन्वये आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम २००३ अन्वये जाहिरात व आकाशचिन्हे इत्यादीवर नियंत्रण करण्याची तरतुद आहे. त्यानुसार मा. स्थायी समिती सभा दि. २९/०२/२००८ ठराव क्र. ४३ अन्वये मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील जाहिरातीबाबत व सुधारीत जाहिरात फी दरपत्रकाच्या प्रस्तावास मा. महासभा दि. १९/०३/२००८ ठराव क्र. ३५ अन्वये दि. ०१/०४/२००८ पासुन सुधारीत जाहिरात फी दरपत्रकास मान्यता मिळाली आहे. सदर ठरावातील दरपत्रकाप्रमाणे सन २००८ मध्ये १३० होर्डींग्जकरिता निविदा मागविल्या असता १० X २० चौ. फुटाच्या (२०० चौ. फुट) होर्डींग्जकरिता प्रति होर्डींग्ज मासिक दर रू. ४००१/- प्राप्त झाला आहे. तसेच माहे डिसेंबर २००९ मध्येही दुसऱ्या टप्प्यातील ९० होर्डींग्जकरिता प्रति होर्डींग्ज रू. ४००१/- मासिक दराचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे व त्यास मा. स्थायी समिती सभा दि. १७/१२/२००९ ठराव क्र. ७८ नुसार मंजुरी मिळालेली आहे. निविदेमध्ये प्राप्त दरानुसार होर्डींग्जकरिता मासिक दर प्रति चौ. फुटास दर रू. २०/ इतका आहे. त्या तुलनेमध्ये मा. महासभा दि. १९/०३/२००८ ठराव क्र. ३५ नुसार नविन सुधारित जाहिरात दरपत्रकामधील अनुक्रमांक (२) कापडी फलक (बॅनर्स) / कटाउट व अ.क्र. (९) होर्डींग्ज (आकाशचिन्हे)/कमानी केलेले दर कमी आहेत.

महानगरपालिकेस जाहिरातीमधून मिळणऱ्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने मा. महासभा दि. १९/०३/२००८ ठराव क्र. ३५ नुसार मंजुर केलेल्या जाहिरात दरपत्रकातील अनुक्रमांक (२) कापडी फलक (बॅनर्स) / कटाउट (९) होर्डींग्ज (आकाशचिन्हे) / कमानी इत्यादीकरिताच्या प्रति चौ. फुटातील दरात वाढ करणे योग्य होईल. याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे.

जाहिरात करिता माहे १ एप्रिल २००८ पासून लागू असलेले दर व नविन प्रस्तावित दर

| **माहे १ एप्रिल २००८ पासून लागू असलेले दर** | | | | | **नविन प्रस्तावित दर** | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र** | **जाहिरातींचे प्रकार** | **मोजमाप** | **जाहिरातींचे दर** | | **प्रति १ चौ. फुट प्रति महिना** | **वार्षिक रूपये** |
| | | | **मासिक रूपये (प्रति चौ. फुटास)** | **वार्षिक रूपये** | | |
| २ | कापडी फलक (बॅनर्स /कटाउट) | १० चौ. फुटापर्यंत<br>१० चौ. फुटावरील | रू. ५/-<br>रू. ३/- | रू. ६०/-<br>रू. ३६/- | रू. १०/- | रू. १२०/- |
| ९ | होर्डींग्ज (आकाशचिन्हे)/कमानी (मोठे जाहिरात फलक) | २०० चौ. फुटापर्यंत<br>२०० ते ३०० चौ.फुट<br>३०० चौ. फुटावरील | रु. ४/-<br>रु. ३/-<br>रु. २.५/- | रु. ४८/-<br>रु. ३६/-<br>रु. ३०/- | रु. १०/- | रु. १२०/- |

**टिप :-**

१) सदर जाहिरातींचे दर क दर्जाच्या रस्त्यासाठी आहेत. ब व अ दर्जाच्या रस्त्यासाठी या दरावर अनुक्रमे ५० टक्के व १०० टक्के अतिरिक्त फी आकारण्यात येईल.

२) वरील जाहिरात फी दर हे फक्त अप्रकाशित जाहिरात फलकासाठी असून प्रकाशित जाहिरात फलकासाठी एकूण फी च्या २० टक्के जादा फी आकारण्यात येईल.

३) फक्त खाजगी जागेतील होर्डींग्ज यांना जाहिरात फी च्या ३० टक्के कमी दराने जाहिरात फी आकारण्यात येईल.

४) खाजगी जागेवरील होर्डींग्जकरिता पक्षकाराकडून जाहिरात फलकाच्या २० टक्के रक्कम अनामत म्हणून घेण्यात यावी.

५) तात्पुरत्या परवानगीकरिता पक्षकाराकडून एकूण जाहिरात फी च्या दुप्पट अनामत रक्कम भरून घेतली जावी. पक्षकाराने परवानगी दिलेला कालावधी संपल्यानंतर त्वरीत फलक काढले नाहीत तर अनामत रक्कम जप्त करण्यात यावी.

तरी महानगरपालिकेस जाहिरातीमधून मिळणाऱ्या उत्पनात वाढ होण्याच्या दृष्टीने मा. महासभा दि. १९/०३/२००८ ठराव क्र. ३५ नुसार मंजुर केलेल्या जाहिरात दरपत्रकातील अनुक्रमांक (२) कापडी फलक (बॅनर्स) / कटाउट (९) होर्डींग्ज (आकाशचिन्हे) / कमानी इ. मध्ये फीमध्ये प्रस्तावाप्रमाणे दरवाढ करणेस ही सभा मंजुरी देउन मा. महासभेस शिफारस करते.

**हेलन गोविंद :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सुचना फेटाळून सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे आणि प्रकरण क्र. १२३ हा घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. १२८ :-**

कापडी फलक, बॅनर्स, कटाउट, होर्डींग्ज व कमानीच्या जाहिरात फी दरामध्ये वाढ करणेबाबत.

**ठराव क्र. १०१ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४, २४५, ३८६ आणि ३९२ अन्वये आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम २००३ अन्वये जाहिरात व आकाशचिन्हे इत्यादीवर नियंत्रण करण्याची तरतुद आहे. त्यानुसार मा. स्थायी समिती सभा दि. २९/०२/२००८ ठराव क्र. ४३ अन्वये मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील जाहिरातीबाबत व सुधारीत जाहिरात फी दरपत्रकाच्या प्रस्तावास मा. महासभा दि. १९/०३/२००८ ठराव क्र. ३५ अन्वये दि. ०१/०४/२००८ पासुन सुधारीत जाहिरात फी दरपत्रकास मान्यता मिळाली आहे. सदर ठरावातील दरपत्रकाप्रमाणे सन २००८ मध्ये १३० होर्डींग्जकरिता निविदा मागविल्या असता १० X २० चौ. फुटाच्या (२०० चौ. फुट) होर्डींग्जकरिता प्रति होर्डींग्ज मासिक दर रू. ४००१/- प्राप्त झाला आहे. तसेच माहे डिसेंबर २००९ मध्येही दुसऱ्या टप्प्यातील ९० होर्डींग्जकरिता प्रति होर्डींग्ज रू. ४००१/- मासिक दराचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे व त्यास मा. स्थायी समिती सभा दि. १७/१२/२००९ ठराव क्र. ७८ नुसार मंजुरी मिळालेली आहे. निविदेमध्ये प्राप्त दरानुसार होर्डींग्जकरिता मासिक दर प्रति चौ. फुटास दर रू. २०/ इतका आहे. त्या तुलनेमध्ये मा. महासभा दि. १९/०३/२००८ ठराव क्र. ३५ नुसार नविन सुधारित जाहिरात दरपत्रकामधील अनुक्रमांक (२) कापडी फलक (बॅनर्स) / कटाउट व अ.क्र. (९) होर्डींग्ज (आकाशचिन्हे)/कमानी केलेले दर कमी आहेत.

महानगरपालिकेस जाहिरातीमधून मिळणऱ्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने मा. महासभा दि. १९/०३/२००८ ठराव क्र. ३५ नुसार मंजुर केलेल्या जाहिरात दरपत्रकातील अनुक्रमांक (२) कापडी फलक (बॅनर्स) / कटाउट (९) होर्डींग्ज (आकाशचिन्हे) / कमानी इत्यादीकरिताच्या प्रति चौ. फुटातील दरात वाढ करणे योग्य होईल. याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे.

जाहिरात करिता माहे १ एप्रिल २००८ पासून लागू असलेले दर व नविन प्रस्तावित दर

| माहे १ एप्रिल २००८ पासून लागू असलेले दर | | | | | नविन प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र | जाहिरातींचे प्रकार | मोजमाप | जाहिरातींचे दर | | प्रति १ चौ. फुट प्रति महिना | वार्षिक रूपये |
| | | | मासिक रूपये (प्रति चौ. फुटास) | वार्षिक रूपये | | |
| २ | कापडी फलक (बॅनर्स /कटाउट) | १० चौ. फुटापर्यंत<br>१० चौ. फुटावरील | रू. ५/-<br>रू. ३/- | रू. ६०/-<br>रू. ३६/- | रू. १०/- | रू. १२०/- |
| ९ | होर्डींग्ज (आकाशचिन्हे)/कमानी (मोठे जाहिरात फलक) | २०० चौ. फुटापर्यंत<br>२०० ते ३०० चौ.फुट<br>३०० चौ. फुटावरील | रु. ४/-<br>रु. ३/-<br>रु. २.५/- | रु. ४८/-<br>रु. ३६/-<br>रु. ३०/- | रु. १०/- | रु. १२०/- |

**टिप :-**

१) सदर जाहिरातींचे दर क दर्जाच्या रस्त्यासाठी आहेत. ब व अ दर्जाच्या रस्त्यासाठी या दरावर अनुक्रमे ५० टक्के व १०० टक्के अतिरिक्त फी आकारण्यात येईल.

२) वरील जाहिरात फी दर हे फक्त अप्रकाशित जाहिरात फलकासाठी असून प्रकाशित जाहिरात फलकासाठी एकूण फी च्या २० टक्के जादा फी आकारण्यात येईल.

३) फक्त खाजगी जागेतील होर्डींग्ज यांना जाहिरात फी च्या ३० टक्के कमी दराने जाहिरात फी आकारण्यात येईल.

४) खाजगी जागेवरील होर्डींग्जकरिता पक्षकाराकडून जाहिरात फलकाच्या २० टक्के रक्कम अनामत म्हणून घेण्यात यावी.

५) तात्पुरत्या परवानगीकरिता पक्षकाराकडून एकूण जाहिरात फी च्या दुप्पट अनामत रक्कम भरून घेतली जावी. पक्षकाराने परवानगी दिलेला कालावधी संपल्यानंतर त्वरीत फलक काढले नाहीत तर अनामत रक्कम जप्त करण्यात यावी.

तरी महानगरपालिकेस जाहिरातीमधून मिळणाऱ्या उत्पनात वाढ होण्याच्या दृष्टीने मा. महासभा दि. १९/०३/२००८ ठराव क्र. ३५ नुसार मंजुर केलेल्या जाहिरात दरपत्रकातील अनुक्रमांक (२) कापडी फलक (बॅनर्स) / कटाउट (९) होर्डींग्ज (आकाशचिन्ह) / कमानी इ. मध्ये फीमध्ये प्रस्तावाप्रमाणे दरवाढ करणेस ही सभा मंजुरी देउन मा. महासभेस शिफारस करते.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- श्रीम. हेलन गोविंद**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**अनिल सावंत :-**

प्रकरण क्र २(१) के अन्वये प्रस्ताव. विषय - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची (ड) मधील प्रकरण २(१) के अन्वये दि. ०२/०२/२०१० रोजीच्या मा. स्थायी समितीमध्ये प्रस्ताव देणेबाबत. मा. स्थायी समिती दि. २१/०५/२००४, प्रकरण क्र. ०७, ठराव क्र. ०९ अन्वये शहरात खाजगी संस्था व व्यक्ती यांना कमानी उभारणे बाबत परवानगी देण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना देण्यात आले होते. यामध्ये फेरबदल करुन कमानी उभारणे बाबत परवानगी देण्याचे अधिकार सर्वस्वी मा. स्थायी समिती सभेला राहतील. सदर प्रस्तावांबाबत एकंदर शहराची वाहतुकीची समस्या व इतर गोष्टींचा विचार करता मिरारोड येथील शरयु माता चौक व शांती शॉपींग सेंटर समोरील स्टेशनजवळ परवानगी दिलेल्या दोन्ही कमानीची परवानगी रद्द करावी असा मी ठराव मांडत आहे.

**मा. सभापती :-**

हा विषय घेण्यास सर्वांची मंजूरी आहे का?

**जुबेर इनामदार :-**

हो घ्या.

**मा. आयुक्त :-**

ठराव वाचायच्या अगोदर माझे ऑब्जेक्शन आहे. परंतु, ज्या कायद्याने आयुक्तांना अधिकार दिलेले आहेत ते अधिकार तुम्ही विड्रॉ करुन चालणार नाही. गर्व्हमेंटने विड्रॉ करायला पाहिजे. कायद्यामध्ये प्रोव्हिजन अशी आहे. जाहिरात आणि कमानी या सगळ्यांचे आयुक्तांना अधिकार आहे या ॲक्टप्रमाणे.

**अनिल सावंत :-**

याच्यामध्ये कसं आहे की, आयुक्तांना जे अधिकार दिलेत स्थायी समिती समोर ठराव होवूनच दिले. २००४ साली हा ठराव झाला.

**मा. आयुक्त :-**

देण्याचा प्रश्न येत नाही. तुम्ही देण्याचा मी घेण्याचा आणि त्यांना देण्याचा प्रश्नच येत नाही. कायद्यानेच दिलेले आहे. वाचून दाखवू का?

**अनिल सावंत :-**

आम्ही सांगतो ना. त्याच्यासाठीच हा प्रस्ताव आणलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

मुंबई प्रांतिक जाहिरात व जाहिरातीचे फलक नियंत्रण नियम २००३ मध्ये पान क्र. ८५६ ते पूर्ण आयुक्तांना अधिकार आहे.

**अनिल सावंत :-**

आता ज्या काही शहरामध्ये कमानी उभारल्या जातात, परमनन्ट कन्स्ट्रक्शन करुन त्या कमानींमुळे वाहतुकीला त्रास होतो किंवा इतर काही अडचणी येतात. त्याबद्दल आयुक्तांनी परमिशन देते वेळी विचार केलेला नाही किंवा कुठच्या सदस्याला किंवा त्या परिसरातल्या नगरसेवकांना माहित नाही की, त्या कमानीसाठी परवानगी दिलेली आहे. हेच लोकप्रतिनिधींना करावं लागते.

**मा. आयुक्त :-**

ठराव करु नका. परंतु, या ॲक्टमध्ये आयुक्तांना अधिकार आहेत.

**अनिल सावंत :-**

आम्ही सांगतो ते स्थायी समितीसमोर आणा म्हणजे सर्व सदस्यांना कळेल.

**दिपक खांबित :-**

स्थायी समितीच्या ठरावानुसार घेण्यात येत नाही.

**अनिल सावंत :-**

कायद्यानुसार द्या. पण त्याची माहिती तरी स्थायी समितीला देणार की नाही?

**मा. सभापती :-**

कायद्याने ठराव ठिक आहे. परंतु, प्रशासन माहिती वगैरे काही घेईल ते तुमच्या हिशोबाने कमानी वगैरे……

**मा. आयुक्त :-**

तुम्हांला माहिती पाहिजे असेल तर देवू. परंतु तुम्ही अधिकार आम्हांला ……

**मा. सभापती :-**

तुमचे अधिकार तुम्ही ठेवा ना. परंतु, सदस्यांना माहिती तरी पाहिजे. ज्या ठिकाणी कमानी बनवायची आहे, नाही बनवायची. त्यांची परवानगी आहे. अडचण आहे किंवा नाही.

**मा. आयुक्त :-**

माहिती मागण्याचा अधिकार आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. स्थायी समिती दि. २१/०५/२००४, प्रकरण क्र. ०७, ठराव क्र. ०९ अन्वये शहरात खाजगी संस्था व व्यक्ती यांना कमानी उभारणे बाबत परवानगी देण्याचे अधिकार मा. आयुक्त सो।. यांना देण्यात आले होते. यामध्ये फेरबदल करुन कमानी उभारणे बाबत परवानगी देण्याचे अधिकार सर्वस्वी मा. स्थायी समिती सभेला राहतील. सदर प्रस्तावांबाबत एकंदर शहराची वाहतुकीची समस्या व इतर गोष्टींचा विचार करता मिरारोड येथील शरयु माता चौक व शांती शॉपींग सेंटर समोरील स्टेशनजवळ परवानगी दिलेल्या दोन्ही कमानीची परवानगी रद्द करावी असा मी ठराव मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

मा. स्थायी समिती दि. २१/०५/२००४, प्रकरण क्र. ०७, ठराव क्र. ०९ अन्वये शहरात खाजगी संस्था व व्यक्ती यांना कमानी उभारणे बाबत परवानगी देण्याचे अधिकार मा. आयुक्त सो।. यांना देण्यात आले होते. यामध्ये फेरबदल करुन कमानी उभारणे बाबत परवानगी देण्याचे अधिकार सर्वस्वी मा. स्थायी समिती सभेला राहतील. सदर प्रस्तावांबाबत एकंदर शहराची वाहतुकीची समस्या व इतर गोष्टींचा विचार करता मिरारोड येथील शरयु माता चौक व शांती शॉपींग सेंटर समोरील स्टेशनजवळ परवानगी दिलेल्या दोन्ही कमानीची परवानगी रद्द करावी असा मी ठराव मांडत आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३२ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची (ड) मधील प्रकरण २(१) के अन्वये प्रस्ताव - मा. स्थायी समिती सभा दि. २१/५/२००४ प्र.क्र.०७, ठराव क्र. ०९ शहरात खाजगी संस्था व व्यक्ती यांना कमानी उभारणेबाबत दिलेल्या परवानगीबाबत फेरविचार करणे.

**ठराव क्र. १०२ :-**

मा. स्थायी समिती दि. २१/०५/२००४, प्रकरण क्र. ०७, ठराव क्र. ०९ अन्वये शहरात खाजगी संस्था व व्यक्ती यांना कमानी उभारणे बाबत परवानगी देण्याचे अधिकार मा. आयुक्त सो।. यांना देण्यात आले होते. यामध्ये फेरबदल करुन कमानी उभारणे बाबत परवानगी देण्याचे अधिकार सर्वस्वी मा. स्थायी समिती सभेला राहतील. सदर प्रस्तावांबाबत एकंदर शहराची वाहतुकीची समस्या व इतर गोष्टींचा विचार करता मिरारोड येथील शरयु माता चौक व शांती शॉपींग सेंटर समोरील स्टेशनजवळ परवानगी दिलेल्या दोन्ही कमानीची परवानगी रद्द करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत मोदी** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ग्रिटा फॅरो :-**

सन्मा. नगरसेविका सौ. अनिता जयवंत पाटील यांच्या मातोश्री श्रीम. लाडकी शामलाल चव्हाण यांचे निधन दि. ३०/०१/२०१० रोजी झाले. तरी ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना करुन दुःखवटा ठराव मांडत आहे. त्याच बरोबर श्री. विजय पाटील यांच्या मातोश्रींचे निधन झाले, तर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना.

**हेलन गोविंद :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

दुःखवटा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**दु:खवटा ठराव क्र. १०३ :-**

सन्मा. नगरसेविका सौ. अनिता जयवंत पाटील यांच्या मातोश्री श्रीम. लाडकी शामलाल चव्हाण यांचे निधन दि. ३०/०१/२०१० रोजी झाले. तरी ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो तसेच श्री. विजय पाटील यांच्या मातोश्री कै. सुमन सदानंद पाटील ह्यांचे निधन झाले आहे तरी त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. ग्रिटा फॅरो** **अनुमोदक :- श्रीम. हेलन गोविंद**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आजची सभा सर्व सन्मा. सदस्या, सदस्य, मा. आयुक्त, उपायुक्त, सचिव साहेब, आपले कर्मचारी वर्ग सगळ्यांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडली त्याबद्दल धन्यवाद करतो. तसेच सभा संपल्याचे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. २.०० वा**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**